सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०७ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४१ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## मुंबईतील धोकादायक आणि जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला गती देणार



मुंबई : मुंबई शहरातील धोकादायक, जुन्या आणि मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या जलद पुनर्विकासासाठी लोकप्रतिनिधींसोबत बैठक घेऊन इमारतींच्या पुनर्विकासातील अडथळे दूर करून या पुनर्विकासाला गती देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली. सदस्य अमिन पटेल यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, बृहन्मुंबई महानगरपालिकेने किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने इमारत धोकादायक घोषित केली, तर प्रथम इमारत मालकाला पुनर्विकासाची संधी दिली जाते. मालकाने ६ महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर न केल्यास, भोगवटादारांच्या किंवा भाडेकरूंच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला ही संधी दिली जाते. जर त्यांनीही ६ महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर केला नाही, तर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत भूसंपादन करून पुनर्विकास करण्याची तरतूद केली आहे. या प्रक्रियेनुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने ८५४ इमारत मालकांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यापैकी ६७ मालकांनी पुनर्विकास प्रस्ताव सादर केले,त्यापैकी ३० मालकांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आली आहे.

राज्य शासन नवीन गृहनिर्माण धोरण आणत असून, यामध्ये सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध होतील याची सुनिश्चित केली जाणार आहे. रखडलेल्या पुनर्विकासामुळे मुंबईबाहेर गेलेल्या मुंबईकरांना परत मुंबईत आणणार तसेच मुंबईतील रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हक्काच्या घरांसाठी सरकार कटिबद्ध आहे, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# महाराष्ट्रात राहणाऱ्यांना मराठी भाषा आलीच पाहिजे! : मुख्यमंत्री





मुंबई : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांनी घाटकोपर येथील एका कार्यक्रमात 'महाराष्ट्रातील प्रत्येकाला मराठी बोलता आलेच पाहिजे, असे नाही', असे वक्तव्य केल्याचा संदर्भ दिला. भैय्याजी जोशी यांचे वक्तव्य मराठीचा अवमान करणारे असल्याचे नमूद करत याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी या वेळी भास्कर जाधव यांनी विधानसभेत केली. त्यावर फडणवीस यांनी वरीलप्रमाणे भूमिका स्पष्ट केली.

आम्ही अन्य भाषेचाही सन्मान करतो. जो स्वत:च्या भाषेवर प्रेम करू शकतो, तोच अन्यांच्या भाषेवर प्रेम करू शकतो. महाराष्ट्रात रहाणार्यांनी मराठी शिकले पाहिजे. महाराष्ट्रात राहाणार्यांना मराठी आले पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांचेही याविषयी दुमत असेल, असे नाही, अशी राज्यशासनाची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मांडली.

मुंबईत येणाऱ्यांनी मराठी शिकलं पाहिजे असं काही नाही. इथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. जसे की मुंबईतील घाटकोपर परिसराची भाषा गुजराती आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला गिरगावात हिंदी बोलणारे कमी सापडतील. तिथे तुम्हाला मराठी भाषा बोलणारे लोक दिसतील. मुंबईत येणाऱ्या व्यक्तीने मराठी शिकलं पाहिजे असं काही नाही. असं वादग्रस्त वक्तव्य जोशी यांनी केलं आहे.

**मुंबईची भाषा मराठीच – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलताना, भैय्याजी जोशी यांचे वक्तव्य मी ऐकलेलं नाही. त्यामुळे ते ऐकून मी त्याच्यावर माहिती घेऊन मी बोलेन. याच्यावर सरकारची भूमिका पक्की आहे. मुंबईची, महाराष्ट्राची, महाराष्ट्र शासनाची भाषा मराठी आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने मराठी शिकलं पाहिजे. प्रत्येकाला मराठी बोलता आलं पाहिजे. माझ्या वक्तव्याबाबत भय्याजी जोशी यांचेही काही दुमत असेल असं मला वाटत नाही. तरीही मी शासनाच्या वतीने सांगतो की, मुंबईची, महाराष्ट्राची भाषा मराठी आहे. इतर भाषांचा इथे सन्मान आहे. कुठल्याही भाषेचा आम्ही अपमान करणार नाही. कारण जो स्वतःच्या भाषेवर प्रेम करतो तोच दुसऱ्याच्या भाषेवरही प्रेम करु शकतो. त्यामुळे तो सन्मान आहेच. म्हणून शासनाची भूमिका पक्की आहे आणि शासनाची भूमिका मराठी आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## अयोध्या पाकड्यांच्या हिटलिस्टवर, बदल्यासाठी दहशतवादी हल्ल्याची तयारी

### अटक केलेल्या दहशतवाद्याकडून मिळाली माहिती

कौशंबी : उत्तरप्रदेशच्या कौशंबी येथे आज, गुरुवारी पहाटे बब्बर खालसा इंटरनॅशनलच्या (बीकेआय) दहशतवाद्याला अटक करण्यात आली आहे. उत्तरप्रदेश एसटीएफ आणि पंजाब पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई कुख्यात दहशतवादी लाजर मसीह याला अटक केली आहे. लाजरकडून मिळालेल्या माहितीनुसार, अयोध्येतील राम मंदिर दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असून अयोध्येत दहशतवादी हल्ला करण्यासाठी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि इस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया (आयएसआयएस) या दहशतवादी संघटनांनी कट रचला आहे. यासाठी त्यांची जोरदार तयारी सुरू असल्याचे समजते.

मसीह हा पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या थेट संपर्कात

दहशतवादी लाजर मसीह हा बीकेआयच्या जर्मन-आधारित मॉड्यूलचा प्रमुख स्वर्ण सिंग उर्फ जीवन फौजीसाठी काम करत होता. तो पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या थेट संपर्कात होता. मसीह याच्याकडून ३ जिवंत हँडग्रेनेड, दोन डेटोनेटर्स, १३ काडतुसे, विदेशी पिस्तूल आणि स्फोटक पदार्थाची पावडर जप्त करण्यात आली आहे. त्याच्याकडे गाझियाबादचा पत्ता असलेले आधार कार्ड आणि एक मोबाईल फोनही (सिम कार्डशिवाय) सापडला आहे.

लाजर मसीह हा पंजाबमधील अमृतसरमधील रामदास भागातील कुर्लियान गावचा रहिवासी असल्याचे सांगितले जाते. दहशतवादी लाजर मसीह हा पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेच्या आयएसआयच्या संपर्कात होता. तो २४ सप्टेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीतून पळून गेला होता.

यापूर्वी, ३ मार्च रोजी हरियाणातील फरीदाबाद येथील बान्स रोड पाली येथून अब्दुल रहमान नामक जिहादी दहशतवाद्याला अटक करण्यात आली होती. इस्लामिक स्टेट इन इराक अँड सीरिया (आयएसआयएस) या दहशतवादी संघटनेने अब्दुल रहमानला अयोध्या राम मंदिरावर हल्ला करण्यासाठी प्रशिक्षण दिले होते.

## अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी दिनेश लोखंडे यांची नियुक्ती



अहिल्यानगर : अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी दिनेश लोखंडे यांची नियुक्ती झाली असून त्याला आरबीआयने देखील मान्यता दिले आहे. दिनेश लोखंडे हे बँकेच्या क्लर्क या पदावर सेवेत रुजू झाले आहे, त्यांच्या प्रामाणिक कामामुळे तसेच बँकेबद्दल असलेले प्रेम पाहता ते आज बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम करत आहे. त्यांच्या अनुभवाचा नक्कीच बँकेला फायदा होईल. अहमदनगर शहर सहकारी बँक ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध सुविधा पूर्वत आहे. दिनेश लोखंडे यांच्या पुढील कार्यास बँकेच्या वतीने शुभेच्छा देत असल्याचे प्रतिपादन चेअरमन सी.ए गिरीश घैसास यांनी केले.

अहमदनगर शहर सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी दिनेश लोखंडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल बँकेच्या वतीने सत्कार करताना चेअरमन गिरीश घैसास,ज्येष्ठ संचालक सुभाष गुंदेचा, अशोक कानडे, संजय घुले, डॉ.विजयकुमार भंडारी, जयंत येलुलकर, डॉ.भुषण अनभुले, दत्तात्रय रासकोंडा, सेवक प्रतिनिधी. संतोष मखरे, वरिष्ठ अधिकारी प्रकाश वैरागर, संजय मुळे आदी उपस्थित होते.

दिनेश लोखंडे म्हणले की मी १९९७ साली अहमदनगर शहर सहकारी बँकेमध्ये क्लर्क या पदावर नोकरीला लागलो आहे. त्यानंतर २०१२ साली जुनिअर ऑफिसर २०२० साली सीनियर ऑफिसर आणि आता बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर संचालक मंडळांनी संधी दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्यांनी टाकलेल्या विश्वासाला पात्र राहत बँकेला पुढे घेऊन जाण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करेल बँकेत मी गेली २८ वर्ष प्रामाणिकपणे आणि सोचोटीने काम केले असल्यामुळेच बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळाली असल्याचे ते म्हणाले.

## केवळ पारंपरिक खेळांसाठी मैदान उपलब्ध

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधत कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यात नाशिक येथे १ ते ९ मार्च २०२५ रोजी पारंपरिक खेळांचा क्रीडा महाकुंभ सुरू आहे. त्याचबरोबर लोढा यांनी केवळ पारंपरिक खेळांसाठी क्रीडांगण उपलब्ध करून दिले आहे. सुरेश (भैय्याजी) जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत या मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले. विशेष म्हणजे या क्रीडांगणाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले आहे.

## पीओके परत मिळाल्यावर शांतता नांदेल; परराष्ट्रमंत्री जयशंकर

### लंडनमध्ये जम्मू-काश्मीर संदर्भात महत्वाचे विधान

नवी दिल्ली : 'जयशंकर झजघ वर बोलताना'जम्मू-काश्मीरचा पाकिस्तानने बळकावलेला भूभाग पाकव्याप्त काश्मीर परत घेण्यासाठी आम्ही प्रतीक्षा करतोय. पीओके भारतात विलिन होताच जम्मू-काश्मीरमध्ये पूर्ण शांतता प्रस्थापित होईल असे वक्तव्य परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी केले आहे. जयशंकर सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असून लंडनमधील चॅथम हाऊस थिंक टँकमध्ये जगात भारताचा उदय आणि भूमिका या विषयावर परराष्ट्रमंत्री बोलत होते.

एस. जयशंकर यांनी काश्मीर आणि केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाबद्दल भाष्य केले. त्यात कलम ३७० हटवणे, आर्थिक उपाययोजना आणि मतदानात लोकांचा सहभाग वाढवणे आदी मुद्यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत डॉलरच्या वापराबद्दल ब्रिक्स देशांच्या मतांवरही त्यांनी यावेळी चर्चा केली. जम्मू-काश्मीर संदर्भात 'जयशंकर झजघ वर बोलताना 'म्हणाले की, काश्मीरमधील बहुतांश समस्या सोडवण्याचे चांगले काम आम्ही केले आहे. मला वाटते की कलम ३७० हटवणे हे एक पहिले पाऊल होते. त्यानंतर, काश्मीरमध्ये विकास, आर्थिक उलाढाल आणि सामाजिक न्याय पुर्नस्थापित करणे हे दुसरे पाऊल होते. निवडणुकांमधील मतदानात लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढवणे हे तिसरे पाऊल होते. आता आम्ही पाकिस्तानने बळकावलेला जम्मू-काश्मीरचा भाग परत मिळण्याची वाट पाहत आहोत. पाकव्याप्त काश्मीर परत मिळवल्यानंतर काश्मीरचा मुद्दा सुटेल असा विश्वास जयशंकर यांनी व्यक्त केला.

जयशंकर पुढे म्हणाले की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकेतील प्रशासन बहुध्रुवीयतेकडे वाटचाल करत आहे. जे भारताच्या हिताशी सुसंगत असे आहे. दोन्ही देशांनी द्विपक्षीय व्यापार कराराच्या आवश्यकतेवर सहमती दर्शविली आहे. आयात शुल्काबाबत (टॅरिफ) जयशंकर म्हणाले की, गेल्या महिन्यात व्हाईट हाऊसमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली होती.

## सीए सौरभ उपाध्ये आय. एस.ए.परीक्षा उत्तीर्ण



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : सी.ए.सौरभ चंद्रशेखर उपाध्ये यांचे आय. एस.ए परीक्षेत उज्वल यश मिळाले आहे.

इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या *इन्फॉर्मेशन सिस्टिम ऑडिट (आयएसए) परीक्षेत छत्रपती संभाजीनगर येथील सी.ए.सौरभ चंद्रशेखर उपाध्ये यांनी परीक्षेत उत्तीर्ण होऊन २०० पैकी १६६ गुण मिळवत उत्तम यश संपादन केले आहे.

आयसीएआयतर्फे इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्सऑफ इंडिया तर्फे देशभरातील चार्टर्ड अकाउंटंट्स यांच्यासाठी ही परीक्षा घेण्यात येते. जानेवारी २०२५ मध्ये ही परीक्षा घेण्यात आली.पोस्ट क्वॉलिफिकेशन कोर्स (पीक्यूसी) अभ्यासक्रमांतर्गत आयएसए परीक्षा घेतली जाते.बँकांच्या सिस्टिम ऑडिटसाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असते.

या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## राज्यस्तरीय ब्राम्हण महा अधिवेशनाचे आयोजन



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ :- सकल ब्राम्हण समाजाच्या एकत्रीकरण व उन्नतीसाठी ब्राम्हण महा अधिवेशन समितीच्या वतीने रविवार २३ मार्च रोजी छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्यमंदिर याठिकाणी सकाळी १० ते सायंकाळी ६ यावेळेत राज्यस्तरीय ब्राम्हण महा अधिवेशन २०२५ चे आयोजन करण्यात आले असून यासाठी पैठण तालुक्यातील समाज बांधवानी मोठया संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय पेशवा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष योगेश धर्माधिकारी यांनी केले आहे.

ब्राम्हण समाजाच्या या राज्यस्तरीय महा अधिवेशनात धार्मिक विधी आणि पूजा-अर्चा करणाऱ्या ब्राह्मणांना मानधन मिळावे, काही ब्राह्मण संघटना आरक्षणासाठी सर्वेक्षण करण्याची मागणी करत आहेत, तर काहीजण आर्थिक निकषावर आरक्षणाची मागणी करत आहेत.राजकीय प्रतिनिधित्व साठी समाजाला निवडणुकीत राजकीय पक्षांनी भरपूर जागा द्याव्यात.धार्मिक शिक्षण आणि संस्कृती जपण्यासाठी सरकारने विशेष योजना असाव्यात,ब्राह्मण समाजाने राजकीय भूमिकेत सक्रियपणे भाग घ्यावा,काही ब्राह्मण संघटना जातीव्यवस्थेच्या विरोधात आवाज उठवत आहेत आणि समानतेसाठी लढत आहेत.ब्राह्मण समाजातील मुला-मुलींना चांगले शिक्षण आणि कौशल्य विकास मिळावे, यासाठी सरकारने योजना असाव्यात आदी विषयांवर या महा अधिवेशनात चर्चा आणि परामर्ष होणार आहे. पैठण मधून समाज बांधवांनी या महा अधिवेशनात मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी खास निमंत्रण पत्रिका तसेच ध्वनिक्षेपक फिरवून योगेश धर्माधिकारी यांच्या कडून आवाहन करण्यात येत आहे.

## गांजा विकणारे दोघेजण अटकेत, २९ लाखांचा मुद्देमाल जप्त



नगर : जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ विक्रीसाठी आणून त्याचा साठा केला असल्याची गोपनीय माहिती मिळाली असता त्या आधारे चौकशी करून खात्री केली असता बाबासाहेब धनाजी बडे, रा.हातगाव शिवार, ता.शेवगाव व अनिल बाबासाहेब बडे यांनी दोन कारमधून मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ विक्रीसाठी आणल्याचे निष्पन्न झाले.

पथक पंच व आवश्यक साधनासह बातमीतील बोधेगाव ते हातगाव जाणारे रोडवर बाबासाहेब धनाजी बडे, रा.हातगाव, ता.शेवगाव याचे घरी जाऊन जनावराचे गोठयात जाऊन खात्री केली असता गोठयातील खोलीमध्ये दोन इसम मिळून आले. त्यांना पोलीस पथक व पंचाची ओळख सांगुन त्यांना नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अनिल बाबासाहेब बडे, वय ३४, रा.हातगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर व बाबासाहेब धनाजी बडे, वय ७०, रा.हातगाव, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर असे असल्याचे सांगितले.पंचासमक्ष आरोपी, गोठयामधील खोली व घरासमोरील दोन कारची झडती घेतली घेऊन घटना ठिकाणावरून एकुण २९,६४,२००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल त्यात ६६.७१० किलो वजनाचा अंमली पदार्थ, दोन मोबाईल, एक मारूती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट कार क्रमांक एमएच-११-बीडी-५७५४ व एक मारूती सुझुकी कंपनीची इरटिगा क्रमांक एमएच-४३-बीवाय-७७८४ असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

ताब्यातील आरोपी अनिल बाबासाहेब बडे याचेकडे जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाबाबत विचारपुस केली असता त्याने जप्त केलेला गांजा हा मोतीराम पुर्ण नाव माहित नाही, रा.मध्यप्रदेश ( फरार ) याचेकडून विक्रीकरीता आणला असून, आणलेला गांजा तो व त्याचे वडील बाबासाहेब धनाजी बडे असे मिळून स्थानिक परिसरामध्ये विकत असल्याची माहिती सांगितली.

वर नमूद आरोपी हे जप्त करण्यात आलेला अंमल पदार्थाचा मुद्देमाल विनापरवाना बेकायदा विक्री करण्याचे उद्देशाने बाळगताना मिळून आल्याने त्यांचेविरूध्द पोकॉ/१६९९ शिवाजी अशोक ढाकणे, नेम.स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी दिलेल्या शेवगाव पोलीस स्टेशन गु.र.नं. १७२/२०२५ एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २० (ब) (ळळ) (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हयाचा पुढील तपास शेवगाव पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शेवगाव उपविभाग सुनिल पाटील यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे व शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.








बीड : आता रब्बी ज्वारींची काढणी पूर्ण झाल्याने उन्हाळ्यात जनावरांसाठी लागणाऱ्या चाऱ्याची तजवीज शेतकरी करीत आहेत. शेतातील वैरणीचा चारा बैलगाडीतून वाहून आणताना शेतकरी. (छाया-कृष्णा शिंदे)

## बीड एमआयडीसीबाबत आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली मंत्री ना.उदय सामंतांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

बीडच्या एमआयडीचा विकास व्हावा याकरिता गेल्या अनेक दिवसांपासून आ.संदीप क्षीरसागर शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्यातच गुरूवारी (दि.६) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान विधीमंडळात महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्याचा औद्योगिक विकास व्हावा याकरिता बीड शहरात स्थित असलेल्या औद्योगिक वसाहतीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून त्याठिकाणी मोठमोठे



उद्योग येतील आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल तसेच आर्थिक स्थिती सुधारेल. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून बीडच्या एमाआयडीसीच्या विकासासाठी पाठपुरावा करत आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली होती. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, प्रादेशिक अधिकारी आदी वरिष्ठ अधिकार्यांसमवेतही बैठका घेतल्या होत्या. आता पुन्हा यासंदर्भात, मुंबई येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना.उदय सामंत यांची भेट घेतली आहे. दरम्यान याविषयी ना.सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच सविस्तर बैठक लावण्याचे सांगितले आहे.

## स्वा.सावरकर महाविद्यालयात पदवी प्रदान समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

विविध विद्या शाखांची पदवी घेतल्यानंतर समाजामध्ये आपण जाणार आहोत, कुणी नोकरी करेल कोणी व्यवसाय करेल परंतु हे करत असताना राष्ट्र सर्वप्रथम हा विचार सर्वांनी आचरणात आणावा असे प्रतिपादन विक्रांत हजारी यांनी केले. स्वा. सावरकर महाविद्यालयात आयोजित पदवी प्रदान कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी हे होते तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ.



उत्तम साळवे, महाविद्यालयाच्या मानव विद्या शाखेचे प्रमुख डॉ. तात्याराम सोंडगे, वाणिज्य विद्या शाखा प्रमुख डॉ. रमेश खंडागळे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ. छत्रपती पांगरकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना विक्रांत हजारी म्हणाले की पदवी मिळाली म्हणजे शिक्षण पूर्ण झाले असे नाही या पुढेही विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर अनेक संधी प्राप्त कराव्यात. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. पि.के. कुलकर्णी म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन कंदले यांनी केले तर आभार डॉ. छत्रपती पांगरकर यांनी मानले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी,प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## साईराम अर्बन मल्टीस्टेटअर्बनच्या संचालकांना ५ दिवस पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

श्री. साईराम अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रे.सो.लि. बीड चे बीड जिल्हयात १६ शाखा असुन सदर मल्टीस्टेट विरुद्ध बिड जिल्हयात विविद्ध पोलीस स्टेशनला ०६ गुन्हे दाखल झाले असुन फिर्यादी मधील एकुण-१,८८,९४,६९५/रुपयाचा अपहार झालेला बाबत तक्रारीमध्ये नमुद आहे तसेच श्री. साईराम मल्टीस्टेटचे आजपावेतो आर्थिक गुन्हे शाखा बीड येथे एकुण-२४५ ठेवीदार यांचे विश्वाघात व फसवणुक झाले बाबत तक्रारी व त्याबाबतचे पुराने या शाखेत दिलेले आहे त्यावरुन गुन्हयातील तक्रारी मधील व प्राप्त ठेवीदार यांचे अर्ज असे एकुण-१५,२९,७२,३९७/- रुपयांची फसवणुक झाले बाबत माहीती आज पर्यंत प्राप्त झालेली आहे त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे.

श्री. साईराम अर्बन मल्टीस्टेट को- ऑप. क्रे.सो.लि. बीडचे संचालक आरोपी नामे १) विठ्ठल ज्ञानदेव जाधव संचालक, २) शिवाजी निवृत्ती खोड संचालक, यांची गुप्त बातमीदारांकडुन माहीती काढून त्यांचे शोधासाठी एक स्वतंत्र पथक तयार करुन मा. विश्वांबर गोल्डे उविपोअ बीड तथा पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड, मा. संतोष शेजाळ पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि योगेश, सफी/ अभिमान ११५४ पोह/ १६१५ गोरख, पोह/ १६७ विष्णु, पोशि/२२८३ भाऊसाहेब यांचेपथकाने दिनांक- १२/०२/२०२५ रोजी पकडून गुन्हयात अटक करण्यात आलेली असुन त्यांचा मा. न्यायालयाकडुन ०५ दिवस पोलीस कोठडी प्राप्त करुन तपास करण्यात आलेला आहे.

सदरची कामगीरी विरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परीक्षेत्र, नर्वानत कॉवत पोलीस अधीक्षक बीड सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड मा. विश्वांबर गोल्डे उपविपोअ बीड तथा प्रभारी पोलीस उप अधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली संतोष पोलीस निरीक्षक आर्थिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि योगेश पवार, सफी/ अभिमान भालेराव, पोह/१६१५ गोरख पोह/१६७ विष्णु, पोशि/२२८३ भाऊसाहेब यांनी केली आहे.

## जयभिम महोत्सव समितीकडून चेक सुपूर्द

### समितीकडून पैशाचा योग्य विनियोग

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन देईल. असा जयभिम महोत्सव बीडमध्ये साजरा केला जातो. स्वबळावर साजरा होणारा जयभिम महोत्सव म्हणून नावारूपाला आला आहे. त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख असताना शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवण्यात आले होते. त्या रकमेसह मिळालेले व्याज असे एकूण ८ लाख ५० हजार रुपये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

बीड शहरातील रिपाइं मध्यवर्ती कार्यालयात, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या उपस्थितीमध्ये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सदरील रकमेचा चेक सुपूर्द करण्यात आला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समिती तत्कालीन समिती प्रमुख असलेले शितलकुमार सुकाळे यांनी त्यांच्या कार्यकाळात शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून जमा करुन ठेवले होते. सर्वानुमते शिल्लक रकमेचा उपयोग बुद्धसृष्टी सुशोभीकरणासाठी खर्च करण्याचे ठरले. त्या अनुषंगाने शितलकुमार सुकाळे सर यांनी फिक्स डिपॉझिटचे सहा लाख आणि त्यावरील व्याज यासह आठ लाख पन्नास हजार रुपये समितीकडे सुपूर्त केले. शितलकुमार सुकाळे सर यांनी शिल्लक रक्कम व्यवस्थित जतन केल्यामुळे आणि रकमेचा विनियोग करण्याचा निर्णय घेताच तात्काळ ८५००००/- चा चेक समितीकडे सुपूर्त केल्याबद्दल शितलकुमार सुकाळे सर यांचा सहृदय सत्कार करण्यात आला.यावेळी राजुजी जोगदंड, अजय सवाई, गौतम चोपडे, संतोष जाधव, नाना मस्के, अरुणा आठवले, बंडू निसर्गन, विजय चोपडे, बाळासाहेब डोळस, महादेव इनकर सर, संजय हनवते आदी उपस्थित होते.

## बीड पंचायत समितीच्या वतीने लिंबागणेश येथे एक दिवस गावकऱ्यांसोबत ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

बीड पंचायत समितीच्या व ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.(०५) बुधवार रोजी लिंबागणेश येथे 'एक दिवस गावकऱ्यांसोबत ' ग्राम दरबार उपक्रम अंतर्गत घेण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.विजय देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी लिंबागणेश डॉ.रमण देशपांडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल यादव, विस्तार अधिकारी पंचायत समिती बीड येळंबकर, कृषी विस्तार अधिकारी चंद्रकांत नागरगोजे, कृषी सहायक वाघ,पेजगुडे,उमेद अभियानच्या प्रियंका जोगदंड, ज्योत्स्ना वखरे, आरोग्य सेवक वीर यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर , सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ आणि ग्रामपंचायत सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी केले तर डॉ.गणेश ढवळे यांनी आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, समीर शेख, दादा गायकवाड, अँड.गणेश वाणी, सुरेश निर्मळ, सय्यद शाकेर, माणिक कांबळे,जीवन मुळे, सुखदेव वाणी, हरिओम क्षीरसागर आदि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.भारतातील ६२ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले गेले.

## रेशीम कोष खरेदी सुरु करण्यासह गेवराई शहरात भुमिगत गटार योजना राबविण्याची आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ मार्च**

रेशीम शेतीचा प्रचार आणि प्रसार व्हावा, शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात रेशीम कोष खरेदी व विक्री करण्याची शासनाने परवानगी द्यावी, गेवराई शहरातील सांडपाणी व मलनिस्सरण करून दुर्गंधीमुक्त स्वच्छ व सुंदर गेवराई करण्यासाठी गेवराई नगर पालिकेला भुमिगत गटार योजना राबविण्यासाठी निधी मंजुर करावा आणि कुसूम सौरपंप योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मागेल त्याला सौरपंप योजनेत समाविष्ट करून तात्काळ सौरपंप उपलब्ध करून देण्याची मागणी गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली. राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान ते बोलत होते.

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या सुरुवातीलाच विधानसभा मतदार संघातील सार्वजनिक महत्वाचे विषय विधिमंडळात मांडले. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत त्यांनी महायुती सरकारचे अभिनंदन करून त्यांना समर्थन दिले. शासनाने जालना येथे रेशीम कोषाची खुली बाजारपेठ उभारल्याबद्दल सरकारचे अभिनंदन करून गेवराई येथे सुध्दा रेशीम कोष खरेदी व विक्री करण्यासाठी बाजारपेठ सुरु करण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली. यावेळी बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यात ४ हजार एकरपेक्षा जास्त क्षेत्रावर रेशीमशेती केली जाते. सतराशेहून अधिक नोंदणीकृत शेतकरी या उद्योगात सहभागी आहेत. ऊस, कापूस यांसारख्या नगदी पिकांबरोबरच रेशीमशेती हा नवीन पर्याय शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी चालना देणारा ठरत आहे. केवळ गेवराई तालुक्यात या उद्योगात सुमारे १२० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल होत असल्याचे सांगताना आ.विजयसिंह पंडित यांनी रेशीम शेतीचे अर्थशास्त्र सभागृहासमोर मांडले.



गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीने रेशीम कोष खरेदी विक्रीसाठी खुली बाजारपेठ सुरु करण्यासाठी दाखल केलेला प्रस्ताव मंजुर करून गेवराईत रेशीम खरेदी केंद्र सुरु करण्याची आग्रही मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी केली.

शहरी भागात उत्तम पायाभूत सुविधांद्वारे नागरीकांचे जीवनमान सुधारण्यासाठी महायुती सरकार नगरोत्थान अभियान प्रभावीपणे राबवित असल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांनी शासनाचे अभिनंदन केले. या बाबत बोलताना आ.पंडित म्हणाले की, गेवराई ही क-वर्ग दर्जाची नगर परिषद असून येथील नागरीक मात्र पायाभूत सुविधांपासून आजवर वंचित आहेत, शहराचा विकास प्रभावीपणे झालेला नाही त्यामुळे गेवराई शहरातील मलनिस्सारणासह सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून गेवराई शहर दुर्गंधीमुक्त व स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी गेवराई शहरात भुमिगत गटार योजना राबविण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून त्यास मंजुरी देण्याची आ.विजयसिंह पंडित यांनी मागणी केली.

राज्यातील शेतकऱ्यांना भारनियमन मुक्त व मोफत विज पुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून मागेल त्याला सौरपंप ही योजना अतिशय उपयुक्त ठरत असल्याचे सांगताना आ.विजयसिंह पंडित यांनी गेवराई विधानसभा मतदार संघातील शेतकऱ्यांच्या व्यथा सभागृहात मांडल्या. ७४०० शेतकरी कुसूम सौरपंप योजनेत पात्र असताना ही योजना अचानक बंद झाली, महावितरणने या पात्र लाभार्थ्यांचा समावेश मागेल त्याला सौरपंप या योजनेत करून तात्काळ मुदतीत पात्र लाभार्थ्यांना सौरपंप अस्थापित करून द्यावा अशी मागणी केली.राज्यपालाच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होत मतदार संघातील सार्वजनिक महत्वाचे विषय सभागृहात मांडल्याबद्दल आ.विजयसिंह पंडित यांचे संबंधितांकडून अभिनंदन होत आहे.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शुक्रवार, ७ मार्च २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## चाकूर येथे देशमुख यांच्या मारेकऱ्यांच्या निषेधार्थ जोडेमारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.६ मार्च -**



चाकूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात युवासेना चाकूर शहरच्या वतीने स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी चाकूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी वाल्मीक कराड यांच्या फोटोला जोडे मारून आंदोलन करण्यात आले. व फरार झालेले आरोपी लवकरात लवकर प्रशासनाने लक्ष घालून त्या आरोपीला पकडून हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे अश्या विविध मागण्यासाठी युवा सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी वैभव धोंडगे, कल्याण भोसले, मंगेश धोंडगे, अमर तेलंग, अशोक मुकुटमोरे, अर्जुन मुंगळे, प्रशांत साळी, शुभम धनेश्वर, गोपाळ जनवाडे, दिनेश बिरणाले, कृष्णा धोंडगे, ओमकार यरवे, अभिषेक राजपूत, शिव जाणकार, दत्ता पवार, आहाद चमकुरे, चिंटू धोंडगे आदी युवासैनिक व शिवसैनिक उपस्थित होते.

▶▶ सरपंच संतोष देशमुख हत्येच्या निषेध...

# शिरूर अनंतपाळ बाजारपेठ कडकडीत बंद





### धनंजय मुंढेंना सहआरोपी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.६ मार्च -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या केल्याचे फोटो समाज माध्यमातून व्हायरल झाल्यानंतर संबंध महाराष्ट्रभर संतापाची लाट पसरली असून या क्रुर व मानवतेला काळामी फासणाऱ्या घटनेच्या निषेधार्थ तसेच आरोपी वाल्मीक कराड व या हत्याकांडतील सर्व आरोपींना तात्काळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे. या म ागणीसाठी शिरूर अनंतपाळ शहरातील म हात्मा बसवेश्वर चौक येथे शिरूर अनंतपाळ वासियांच्या वतीने बाजारपेठ कडकडीत बंद करून मन सुन्न करणाऱ्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

या हत्याकांडतील सर्व आरोपींना मदत करणाऱ्यांना सह आरोपी करावे व वाल्म ीक कराड सारख्या नराधमाला राजाश्रय देणारे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांना सह आरोपी करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली. यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते डॉ. अरविंद भातांब्रे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अँड. सुतेज माने पाटील, शिवसेना (उ.बा. ठा) तालुकाप्रमुख भागवत वंगे, मराठा आंदोलक बाळासाहेब पाटील, काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, अँड. सुहास मादलापुरे, विनोद धुमाळे, दत्ता भोसले, विशाल गायकवाड, गुरुनाथ अचवले, विश्वनाथ हांद्राळे, व्यंकट कल्ले, अमोल पाटील, पिंटू पाटील, मारोती माने, संभाजी हात्तरगे, गोविंद श्रीमंगल, गनपत चाकुरे, तसेच शहरातील व तालुक्यातील नागरीक, व्यापारी उपस्थित होते.

यावेळी स्व. संतोष देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून नागरिकांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## विविध प्रलंबित मागण्यासाठी एस. टी. कर्मचाऱ्यांचे निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.६ मार्च -**



शिरूर अनंतपाळ तालुक्यातील बाकली येथील वाहक राजकुम ार सुर्यवंशी यांनी कामगार संघटनेची जबाबदारी स्वीकारताच एस.टी. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी आवाज उठविला आहे.

त्यांनी तात्काळ आपल्या कर्मचारी सहकाऱ्यांना सोबतीला घेऊन आज निलंगा येथील राज्य परिवहन महामंडळाच्या गेटवर निदर्शने करण्यासाठी बैठक घेतली व त्याप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने गेटवर कामगार संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन, निदर्शने करण्यात आली.

यावेळी एस.टी. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यासाठी आंदोलन करुन निदर्शने केली यात प्रामुख्याने आर्थिक प्रलंबित मागण्या, ५३ टक्के महागाई, भत्ता १६ ते २० या कालावधीतील देय होणारी थकबाकी, सन २०१८ पासून महागाई भत्त्याची थकबाकी, आरटीओ कडून होणारा चालकाला दंड, एकतर्फी जाहीर केलेले वेतन वाढ यातील वार्षिक वेतन वाढीचा दर एक टक्क्याने कमी केला होता.

त्याची थकबाकी, कोरोना कालावधीतील सुधारित हजेरी शिस्त आवेदन पद्धत रद्द करणे व सुधारित नवीन शिस्त आवेदन पद्धत लागू करणे या व इतर मागण्यासाठी कामगार संघटनेचे अध्यक्ष राजकुम ार सुर्यवंशी व सचिव अंकुश काळे यांनी आगारातील गेटवर निदर्शने आंदोलन केले.

यावेळी श्याम येरनवाड, खंडू धुमाळ, प्रकाश शाणीमे, राजेंद्र सूर्यवंशी, अंकुश काळे, सुधाकर वडमीले, दयानंद मलशेट्टी, गोविंद कन्हेरे, संतोष गायकवाड, अनिल बिराजदार, रामराजे कांबळे, गफार बागवान, सुरेश पवार, सुभाष शेंद्रे, दत्ता शिंदे, दयानंद बडगे, भगवान राजे, दिलीप येडले, राम मारापल्ले, रणजित माने, कोळळे अप्पा, इरनाथ माने, राम शिरूरे यांच्यासह आदि कर्मचारी, पदाधिकारी म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र हत्तीबेट येथे श्री संत जगद्गुरू तुकाराम महाराज; मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.६ मार्च -**

उदगीर शहरापासून १६ किमी पश्चिमेस मौजे हट्टी बेट नावाच्या टेकडीला प्राचीन काळापासून म हत्त्व प्राप्त आहे. प्राचीन मंदिरे, गुहा, कोरीव शिल्पे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दिसतात. हत्ती बेट धर्मापूरी देवर्जन येथे प्रादेशिक पर्यटनाचा दर्जा मिळाला आहे. मराठवाडा मुक्तिसंग्रामात स्वातंत्र्यसैनिकांनी रझाकारांविरुद्ध लढा दिला आणि शेवटपर्यंत रझाकारांना हत्ती बेट जिंकू दिले नाही, असा इतिहास येथे सांगितला जातो. हत्ती बेटावर दत्ताचे मंदिर तसेच गंगाराम महाराजांची समाधी आहे.

लोकांच्या श्रद्धेचा भाग असलेल्या या ठिकाणी पंचक्रोशीतील आणि शेजारच्या राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक येतात. पौर्णिमेला येथे भजन, कीर्तन आणि प्रवचनांचे आयोजन केले जाते. ही परंपरा गत ८० वर्षापासून सूरू असून ती आजतागायत सुरू आहे.यातच एक भर टाकत स्व. रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांच्या संकल्पनेतून श्री संत जगद्गुरु तुकाराम यांचे भव्य असे मंदिर येथे उभे टाकले आहे.

देवणी व उदगीर तालुक्यातील पर्यटन श्रीक्षेत्र हत्तीबेट येथे श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज म ुर्ती प्राणप्रतिष्हा व कलशारोहण कार्यक्रम दि. ७ ते ९ मार्च रोजी आयोजित करण्यात आला असून हत्तीबेट पंचक्रोशीतील व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी श्री संत जगद्गुरु तुकाराम महाराज मुर्ती प्राणप्रतिष्हा व कलशारोहण कार्यक्रमासाठी सर्व हत्तीवेट पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ‘गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार’ योजनेचा लाभ घ्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

गावोगावी जलसंधारणाच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलण्यात आले असून, शासनाने तलावांचे पुनरुज्जीवन आणि नाला खोलीकरण - रुंदीकरणासाठी विशेष योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ‘गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार’ आणि ‘नाला खोलीकरण व रुंदीकरण’ या योजनांच्या माध्यमातून तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## वलांडी-हैदराबाद बस सेवा चालू; ग्रामस्थांच्यावतीने बसची पुजा

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.६ मार्च -**





सीमावर्ती भाग व महाराष्ट्र, कर्नाटक राज्यातील प्रवाशांची सोय व्हावी म्हणून भालकी आगाराच्यावतीने वलांडी-अळवाई-मेहकर-भालकी-बीदर-जहिराबाद मार्गे हैदराबाद अशी आणखी एक वाढीव बससेवा चालू करण्यात आली आहे. दररोज हैद्राबाद जाणाऱ्या बस सेवेचा प्रारंभ आज गुरुवार ता.६ रोजी झाला.

सदर बस दररोज दुपारी दीड वाजता वलांडी येथून निघेल व हैदराबादला रात्री आठ वाजेच्या दरम्यान पोहचेल आणि परत त्याच मार्गे पहाटे पाच वाजता वलांडीकडे निघेल आणि दुपारी दीड वाजता वलांडी येथे पोहचेल. सदरील कर्नाटक शासनाच्या वतीने भालकी आगाराने सुरू केल्याने बसचे वलांडी येथील बस स्थानक परिसरात ग्रामस्थांच्यावतीने जोरदार स्वागत करण्यात आले. तसेच चालक संभाजी तळीखेडे आणि वाहक नागनाथ पाटील यांचा शाल, श्रीफळ फेटा बांधून सत्कार करण्यात आला.

यावेळी उमाकांत नागलगावे, बालाजी सोनकवडे, हसन मोम ीन, मुस्ताक कादरी, आसलम ताबोळी, रवी स्वामी, गणेश चवाळे, रामलिंग बावगे, महम्मद शिकूर बौडीवाले यांच्यासह प्रवासी नागरिक यांची उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात डोडला डेअरी कंपनीच्या कॅम्पस इंटरव्यूला प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ मार्च -**

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाच्या दुग्धशास्त्र विभागाच्या वतीने डोडला डेअरी लिमिटेड, हैद्राबाद यांच्या सहकार्याने कॅम्पस इंटरव्यू मोठ्या उत्साहात पार पडला. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत महाविद्यालयाच्या परिसरात हा इंटरव्यू संपन्न झाला.

या मुलाखतींसाठी केवळ उदगीरच नव्हे, तर इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सुद्धा या संधीचा लाभ घेतला. यामध्ये एकूण ४० विद्यार्थ्यांनी मुलाखतींसाठी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक क्षमता सिद्ध केली. डोडला डेअरी लिमिटेडमधून हैदराबाद येथून इंटरव्यू घेण्याकरिता आलेले नागेंद्र कुमार, वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन), किरण कुमार, प्रादेशिक व्यवस्थापक महाराष्ट्र, ब्रम्हय्या, उपव्यवस्थापक (गुणवत्ता नियंत्रण), तृषाल, सहायक व्यवस्थापक (दुग्ध खरेदी), रवी चंदन, भरती कार्यकारी यांनी विद्यार्थ्यांना दुग्ध उद्योगातील संधी, गुणवत्ता नियंत्रण आणि दुग्ध व्यवसायातील आधुनिक प्रक्रिया तसेच शेतीविषयक अत्याधुनिक प्रक्रिया या विषयी माहिती दिली.

तर कार्यक्रमाचे अध्यक्ष व म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे यांनी डोडला व्यवस्थापनाचे आभार व्यक्त करताना या संधीचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आव्हान केले. व्यासपीठावर आय.क्यू.ए.सी. समन्वयक तथा विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. विष्णू पवार उपस्थित होते.


महाविद्यालयाचा व्यवस्थापन समितीने या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योगाशी जोडणाऱ्या प्रयत्नांची प्रशंसा करत भविष्यात अशा अधिक संधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

त्याचबरोबर डोडला डेअरी व्यवस्थापनाने महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या तांत्रिक कौशल्ये आणि आत्मविश्वासाचा गौरव करत भविष्यातही अशाच कॅम्पस इंटरव्यू बाबतची संधी उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला. या कार्यक्रमाचे संयोजक दुग्धशास्त्र विभाग प्रमुख प्रा. आर.बी. येडतकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. तर आभार प्रदर्शन डॉ. अनंत टेकाळे यांनी केले.

या कार्यकर्मासाठी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एच.ए. तीरपुडे सहयोगी प्राध्यापक डॉ. अनंत टेकाळे, डॉडी.बी. मुळे, हिंदी विभागाचे प्रा.बी.पी. सूर्यवंशी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.व्ही.डी. गायकवाड, यशवंत महाविद्यालयाचे प्रा. बाळासाहेब लांडगे इत्यादी उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता शिक्षकेतर कर्मचारी रमेश दरवेशवार, राजू बसगोंडा यांनी अथक परिश्रम घेतले.

## निटूरच्या सरपंच प्रतिभा सोमवंशी उत्कृष्ठ कामाबद्दल पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ मार्च -**

नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अनुषंगाने दि.४ व ५ मार्च रोजी दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत लातूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतम ध्ये उत्कृष्ठ काम करणाऱ्या सहा गावाच्या महिला सरपंचाचा केंद्रीय मंत्र्याच्या हस्ते पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. त्यात निलंगा तालुक्यातील निटूर च्या सरपंच प्रतिभा सोमवंशी यांना ही पुरस्कार देवून गौरवण्यात आले. त्यामुळे निटूर व पंचक्रोशीमधून त्यांचे अभिनंदन होत आहे .

केंद्रीय पंचायत राज विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील उत्कृष्ट काम करनाऱ्या ग्रामपंचायतीना पुरस्कार देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये निटूर ग्रामपंचायत विकास कामात राज्यात पहिली आली असल्यामुळे सरपंच सोमवंशी यांना पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. तसेच या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील इतर ही गावच्या सरपंचांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यात सुनीता नारायणपुरे (गणेशवाडी ता.शि. अनंतपाळ), कोमल गुणाले (नागतिर्थवाडी ता. देवणी), रंजना म्हेत्रे (बोळेगाव), प्रिती बुलबुले (सामनगाव ता. लातूर) व रेणापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सुमित जाधव यांची निवड करण्यात आली होती. त्यातुन निटूर गावच्या लोकनियुक्त सरपंच प्रतिभा अनिल सोमवंशी यांना महाराष्ट्र राज्यातून राष्ट्रीय महिला सरपंच उकृष्ट कामगिरी हा पुरस्कार दिल्ली विज्ञान भवन येथे केंद्रीय पंचायत राज्य मंत्री भारत सरकार ललन सिंह, पशुपालन व दुग्धविकास केंद्रीय राज्यमंत्री एसपी सिंह बघेल, केंद्रीय महिला व बाल कल्याण विकास मंत्री अन्नपूर्णा देवी, केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे, केंद्रीय पंचायत राज सचिव विवेक भारतवाज व इतर मान्यवर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## संतोष देशमुख हत्याकांडप्रकरणी तेर बंद

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.६ मार्च -**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील आरोपींना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे या मागणीसाठी दि.६ मार्च रोजी तेरकरांनी तेर (ता. धाराशिव) बंद ठेवून निषेध करण्यात आला.

देशमुख यांच्या हत्येचे व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्यानंतर ज्या पद्धतीने हत्या करून राक्षसीवृत्ती समोर आली संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. म ाणुसकीला काळिंबा फासणारी घटना घडली असून संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा झाली पाहिजे तसेच धनंजय मुंडे यांना सह.आरोपी करून कारवाई करा म्हणून तेर गाव बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला. व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवून केलेल्या आवाहनाला उत्सफुर्त प्रतिसाद दिला.

## तालुका अध्यक्षपदी प्रा.डॉ.बी.आर. गायकवाड यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.६ मार्च -**



भारतीय बौद्ध महासभा निलंगा तालुका शाखेची नवीन कार्यकारिणीची बैठक दि.१ मार्च रोजी निलंगा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथील बौद्ध विहारात तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीला तथागत बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून, त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले. यावेळी जिल्हा कार्यकारिणीच्या उपस्थितीत तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

तालुकाध्यक्षपदी प्रा.डॉ.बी. आर. गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तसेच तालुका कार्यकारिणी मध्ये सरचिटणीस भागेश भगवानराव कांबळे, कोषाध्यक्ष अनिल अंकुश गाडे, उपाध्यक्ष (संस्कार विभाग) इंद्रजीत लिंबाजी कांबळे, सचिव (संस्कार विभाग),सूर्यवंशी संदीप ज्ञानेश्वर, अंकुश पंढरी गायकवाड, उपाध्यक्ष (प्रचार-पर्यटन विभाग) दयानंद कोंडीबा टाकळीकर, सचिव (प्रचार-पर्यटन विभाग) प्रेम नाथ सदाशिव कांबळे, दयानंद युवराज काळे, उपाध्यक्ष (संरक्षण विभाग) अॅड. विशाल वामनराव गायकवाड, सचिव (संरक्षण विभाग) दत्ता महादू सोनकांबळे, सुभाष दत्तू कांबळे, कार्यालयीन सचिव पांडुरंग लक्ष्मणराव ढवळे, हिशोब तपासणीस शिवाजी भिकाजी बनसोडे, तालुका संघटक विलास रंगराव कांबळे, नवनाथ नरसिंग गायकवाड, कमलाकर जगन्नाथ भाले, आनंद रामचंद्र साबळे, बाबुराव धोंडीबा कांबळे, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कायदेविषयक सल्लागार मंडळ तालुकाप्रमुख अॅड. धनराज धैर्य आदी पदाधिकाऱ्यांचा निलंगा तालुका कार्यकारिणीत नियुक्ती करण्यात आली आहे.

## जगण्यासाठीचा आदर्श पाठ म्हणजे इंटिमेट डेथ : अर्चना मुळे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.६ मार्च -**

जन्म आणि मृत्यू हे आयुष्याचे दोन टोक आहेत. पुनर्जन्म किंवा अस्तित्व हे मृत्यूने लावलेला शोध आहे. जगणं समृद्ध असेल तर मृत्यू चांगला येतो. वर्तमानाच्या आशा, वेदनांचे मर्म, जीवनातील सुख-दुःख आणि मृत्यू यांच्यातला संवाद पुनर्स्थापित केले तर आयुष्यावरच प्रेम माणसाला जगण्याची प्रेरणा देत.

खरे आयुष्य जगण्यासाठीचा आदर्श पाठ घालून देणारी साहित्य कृती म्हणजे इंटिमेट डेथ हि होय, असे मत अर्चना मुळे यांनी व्यक्त केले.

श्रुतिका पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गतच्या महिला दिन विशेष ३३२ व्या वाचक संवादामध्ये सांगली येथील सुप्रसिद्ध समुपदेशक अर्चना मुळे यांनी डॉ. मारी डी हेनेझेल लिखित इंटिमेट डेथ या साहित्यकृतीवर सुंदर असा संवाद साधताना त्या म्हणाल्या की, मृत्यू हे एक फार मोठे रहस्य आहे. मृत्यूम ुळेच आयुष्याला मोल येत. मृत्यूला नाकारण्यापेक्षा त्याला जीवनाचा एक भाग बनवला पाहिजे. कारण मरणासन्न व्यक्ती आपल्या वेदना, निराशा सहवासातील व्यक्तीकडे व्यक्त करतो.

या पुस्तकात लेखकाने वर्तम ान पुन्हा सादर करून आमच्या जाणिवेतून निसटलेल्या विषयांच्या आणि काळाच्या दूरवरच्या कक्षा, वेदना आणि त्यांचे मर्म, दुसऱ्यांचे



दुःख, जीवन आणि मृत्यू यांच्यातला निरंतर संवाद यासाठी वर्तमान पुन्हा सांगण्याचा प्रयत्न केलाय. याबरोबरच मरणासन्न रुग्णांशी टिकवून ठेवलेला संवाद या पुस्तकातून सादर केलेला आहे.

यानंतर संपन्न झालेल्या चर्चेत, वर्षा वैद्य, उषा तोंडचिरकर, प्राचार्य विजयकुमार पाटील, सुरेश विश्वब्रह्मा, प्रतिभा मुळे, प्रा.डॉ. म.ई. तंगावार, डॉ. कांत जाधव यांचे सह अनेकांनी सहभाग नोंदवला.

यावेळी जि.प.प्रा. शाळा, डिगोळ येथे सहाव्या वर्गात शिकणारी बाल वाचक मानवी बिरादार हिने वाचलेल्या छत्रपती शिवाजी महाराज या कृष्णा केळुसकर लिखित पुस्तकाबद्दल म ाहती सांगितली. सूत्रसंचालन डॉ. चंद्रभागा शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय अर्चना नळगीरकर यांनी करून दिला तर आभार सुचिता अनंतराव कदम यांनी मानले.

या कार्यक्रमास परिसरातील अनेक डॉक्टर, वकील, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, साहित्यिक, व्यापारी-वाचक रसिकांसह बालगोपाळ, स्त्री-पुरूष उपस्थित होते.

## अग्रलेख

# गो-संवर्धनाचा समृद्धी-मार्ग

नव्या शैक्षणिक धोरणांमुळे विद्यापीठ 'सोबतच शाळा-महाविद्यालयांमध्ये ही नवतेचे वारे वाहू लागले आहेत. याचा फायदा जसा विद्यार्थ्यांना होत आहे, तसाच तो शिक्षकांना आणि शैक्षणिक क्षेत्रालाही होत आहे. अनेक नवे प्रयोग नव्या शैक्षणिक धोरणांतर्गत केले जात आहेत. शास्त्रज्ञ, संशोधक आणि वैज्ञानिकांना यानिमित्ताने 'अच्छे दिन' आले आहेत. निरनिराळ्या क्षेत्रांत सुरू असलेल्या प्रयोगांमुळे शिक्षणात जिवंतपणा आणि प्रयोगशीलता आली आहे. विद्यार्थी यामुळे शिक्षणानंदाची अनुभूती घेताना दिसत आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाचा फायदा सर्वदूर सर्वच विद्याशाखांना होत असून, त्याचे परिणामही समोर आले आहेत. नागपूरातील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठातही एका नवतंत्रज्ञानाचा वापर सुरू आहे. त्याच प्रयोगाची दखल घेत, स्वदेशी गोवंशाच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी माफसूद्वारे उपयोगात आणल्या जात असलेल्या इन विट्रो फर्टिल यजेशन (आयव्हीएफ) आणि भ्रूण प्रत्यारोपण (ईटीटी) तंत्रज्ञानाने कृषी क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडेल, असा विश्वास राज्याचे राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी नागपुरात या विद्यापीठाच्या बाराव्या दीक्षान्त समारंभात बोलताना व्यक्त केला. या विश्वासास पात्र ठरावी, अशीच कामगिरी गेल्या काही वर्षांत या विद्यापीठाने बजावलेली आहे. माफसूमध्ये या तंत्रज्ञानाचा अतिशय नियोजनबद्ध वापर होत आहे. २०२१ पासून आयव्हीएफ तंत्रज्ञानाने येथे ४७ वासरे जन्माला आली असून, भ्रूण प्रत्यारोपण तंत्राद्वारे ९७ गाईंची गर्भधारणा करण्यात येथील अभ्यासक आणि संशोधकांना यश आले आहे. शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयोगी ठरणाऱ्या देशी गाईंची संख्या वेगाने कमी होत असताना माफसूद्वारे सुरू असलेल्या या नवोन्मेषी संशोधनाचा गौरव केला जायला हवा. संशोधनाच्या क्षेत्रातील बदलत्या प्रवाहासोबत चालणे, नवविचारांना, नवतंत्रज्ञानाचा स्वीकार आणि काळाची पावले ओळखून पुढे येणाऱ्या आव्हानांवर मात करण्याच्या विद्यापीठ व्यवस्था पनाच्या क्षमतेमुळेच हे सारे शक्य झाले आहे. यामुळे निश्चितच कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल संभवतो.

राज्यपाल लांचाच विषय पुढे नेताना पद्मविभूषण अनिल काकोडकर यांनी वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि दुष्काळ अशा हवामान बदलाचे दुष्परिणाम मानवासह पशुधनावरही होत असल्याचे नमूद केले. या बदलत्या वातावरणात पशुपालन क्षेत्राला प्रतिकारक्षम बनवतानाच पशुधनाच्या हवामान बदल प्रतिरोधक जमाती विकसित होण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. यावर मत व्यक्त करताना राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी, हे विद्यापीठ पशु आणि मत्स्य विज्ञानात जागतिक पातळीवर आघाडी घेईल, याकरिता पायाभूत सुविधा, संशोधन आणि सामुदायिक कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करण्यास कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. एकाचवेळी विद्यापीठ, संशोधक आणि सरकारने विशिष्ट दिशेने पावले टाकल्याने पशुपालन आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' असा मार्ग आपसूकच निश्चित झाला आहे.

आयव्हीएफ तंत्रज्ञानातून गाई-म्हशींच्या बीजांड कोषातून स्त्रीबीज काढून प्रयोगशाळेत त्याचे फलन केले जाते. त्यासाठी लिंग वर्गीकृत रेतमात्रांचा वापर केला जातो. त्यामुळे गाई-म्हशींना मादी वासरे जन्माला येण्याचे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. फलित स्त्रीबीज नंतर ७ दिवस इन्क्युब टरमध्ये ठेवून ८-९ दिवसांपूर्वी माजावर येऊन गेलेल्या किंवा माज नियमन केलेल्या गाई-म्हशींच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केले जाते. महाराष्ट्रात कृत्रिम रेतनाला १९५० सालापासून प्रारंभ झाला. दूध उत्पादन वाढीसाठी प्रारंभी गाईंमध्ये साहीवाल, गीर, रेड सिंधी आणि म्हशींमध्ये मुऱ्हा जातीच्या वळूंचा वापर केला गेला.

देशी गोवंश वाढविण यासाठी प्रयत्न का सुरू आहेत, त्याची बरीच कारणे आहेत. सर्वाधिक पशुधन संख्येचा देश म्हणून जगात भारताची ओळख आहे. भारतात देशी गोवंशाच्या ३० जाती आहेत. या जाती स्थानिक वातावरणात विकसित झाल्यामुळे व त्यांच्या काटक गुणांमुळे पिढ्यानपिढ्या निर्माण झालेली रोगप्रतिकार क्षमता व उत्पादन सातत्य टिकवून आहेत. दुधाची सतत वाढणारी मागणी, दर्जेदार दूध निर्मितीची गरज आणि शेती क्षेत्र मालकी सातत्याने कमी होत असल्यामुळे बैलावर आधारित शेतीबाबत गांभीर्याने विचार करण्याचीही गरज निर्माण झाली आहे. देशी गोवंशांची अनेक वैशिष्ट्ये आहेत. देशी वंशाच्या गाई निकृष्ट प्रतीच्या चाऱ्यावरही तग धरून राहतात. यांची रोगाशी रक्षमता उत्तम असते. या गाई वेगवेगळ्या हवामानात टिकून राहतात. देशी गोवंशामध्ये ओढकामा साठीच्या जातींचा समावेश होतो. या जातीचे बैल शेतीच्या कामासाठी उत्कृष्ट म्हणून गणले जातात. या गाईंपासून दूध कमी मिळते. यात खिल्लार, डांगी, लाल कंधारी, गवळाऊ, मालवी, हलीकर, अमृतमहल, सिरी, कांगायम या जातींचा समावेश होतो. दुहेरी जातीचे बैल शेतीका मासाठी चांगले गणले जातात. या जातीमध्ये गाईचे दूध उत्पादन भरपूर असते. हरयाणा, ओंगोल, कांकरेज, देवणी आणि राठी या जातींचा यात समावेश होतो. गीर, साहिवाल, लाल सिंधी, थारपारकर या जाती दुधाळ म्हणून ओळखल्या जातात. देशी गाईचे महत्त्व किती आहे, हे जाणून घेण्यासाठी नुकतीच घडलेली एक घटना जाणून घ्यावी लागेल. ब्राझीलमध्ये विकण्यात आलेल्या एका भारतीय गाईची सर्वत्र चर्चा होत आहे. ब्राझीलमध्ये लाखो गाई असल्या तरी तेथे लिलाव करण्यात आलेली एक गाय खास आहे. व्हिएटिना-१९ नावाच्या नेल्लोर प्रजातीच्या गाईने नुकतेच गिनीज बुकात नाव नोंदविले. लिलावात ही गाय ४० कोटी रुपयांना विकली गेली. ही गाय जगातील सर्वांत महागडी गाय ठरली आहे. या गाईचे वजन १,१०१ किलोग्रॅम आहे. हे वजन याच प्रजातीच्या इतर गाईंच्या सरासरी वजनाच्या दुप्पट आहे. ब्राझीलमधील ८० टक्के गाई झेबस या भारतात उगम पावलेल्या उपप्रजातीच्या आहेत. कुबड्या मानेमुळे किंवा मानेवरील त्वचेला पडलेल्या घड्यांमुळे त्या ओळखल्या जातात. व्हिएटिना-१९ हा नेल्लोर जातीचा एक भाग आहे, ज्याला ओंगोल गाय, असेही संबोधले जाते आणि विशेष बाब म्हणजे ही प्रजाती आंध्रप्रदेशातील आहे. १८०० च्या दशकात या प्रजाती त्या देशात पाठवण्यात आल्या. नेल्लोर जिल्ह्याच्या नावावरून या प्रजातीला हे नाव देण्यात आले. मजबूत स्नायुबांधणी, उष्णता सहन करण्याची क्षमता, रोगप्रतिक ारशक्ती, चरण्याच्या सवयी, थुलथुलीत शरीर आणि आकर्षकता या वैशिष्ट्यांमुळे ही गाय अत्यंत मौल्यवान ठरली असून, तिला ब्राझीलमध्ये मोठी मागणी आहे. नेल्लोर गाय आता पशुधन क्षेत्राचा मुख्य आधार झाली आहे. ही प्रजाती आर्थिक विस्तार आणि कृषी उत्पादन या दोन्ही बाबींमध्ये भरीव योगदान देत आहे. नेल्लोर प्रजाती श्रेष्ठ असण्याचे कारण म्हणजे या गाईंकडे पुनरुत्पादनाची उच्च क्षमता आहे आणि या प्रजातीकडून उत्कृष्ट वैशिष्ट्यांसह संतती निर्माण होण्याची अपेक्षा असते.

या घटनेकडे बघितले तर देशी गोवंशाची महत्ता कळून येते. गेल्या काही वर्षांत भारतातील देशी गोवंशात संख्यात्मक ऱ्हास झाल्याचे दिसून येते. देशी गोवंशाचे महत्त्व शेतकऱ्यांसाठीही अतिशय मोलाचे आहे. आताशी देशी गोवंश ही संकल्पना मोठ्या प्रमाणात रुजू लागली आहे. सध्याच्या काळात वैज्ञानिक शिफारशींसह देशी गोवंश संवर्धित केला जाण्याची गरज आहे. पैदाशीच्या बळूची जनुकीय अभियांत्रिकी पडताळणी करण्याची नियोजन पद्धती अतिशय महत्त्वाची असून, केवळ अशा निवड झालेल्या वळूकडून शुद्ध वंशाची पिढी अपेक्षित आहे. देशात अनेक गोशाळा असून, त्या नित्यनेमाने देशी गाईंचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धन करण्याचे कार्य करीत आहेत. विशेष म्हणजे अनेक गोशाळा व्यावसायिक असल्या तरी सामाजिक उद्देशाने काम करणाऱ्याही अनेक गोशाळा अस्तित्वात आहेत. शासकीय मदत न घेता या गोशाळा दात्यांकडून मिळालेल्या देणग्यांवर यशस्वीपणे मार्गक्रमण करीत आहेत. अशा गोशाळांकडे पोलिसांनी कसायांकडून सोडविलेल्या गाई आणल्या जातात. तथापि, त्या गाईंच्या पंचगव्यापासून औषधोत्पादन केले जाते. त्याला मोठी मागणीही आहे. या गाईंच्या शेणापासून परिसरात जैविक शेतीचे प्रयोग सुरू आहेत. शेण खत, गांडूळ खत, गोबर गॅस प्लांट आणि त्यातून उरलेल्या स्लरीतून देवी-देवतांच्या मूर्ती, दिवे तयार करून वनवासींना अर्थसमृद्ध केले जात आहे. जैविक शेतीतून शेतकऱ्यांच्या खर्चात कपात झाली असून, ते आनंदी जीवन जगू लागला आहे. देशी गाईच्या संवर्धनातून निर्माण झालेली 'काऊ इकॉनॉमी' देशाच्या समृद्धीतही भर घालत आहे. ■

## इतस्ततः

# जागतिक महिला दिनी मुस्लिम महिला 'दीन'

**डॉ. विवेक राजे**

दरवर्षी ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून जागतिक पातळीवर साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागे स्त्रियांनी मानवी जीवन समृद्ध करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि लिंगभेद विरहित सामाजिक समता जागतिक पातळीवर प्रस्थापित करणे हे प्रमुख उद्देश आहेत. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्त्रियांनी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अथवा राजकीय क्षेत्रात बजावलेल्या कामगिरीचा एक प्रकारे सत्कार व कृतज्ञता व्यक्त करणारे कार्यक्रम आयोजित केले जातात. हे कार्यक्रम मानवी जीवनाच्या सर्व स्तरांवर साजरे करून लिंगभेद विरहित सर्वांना समान अधिकार असलेले जग निर्माण करण्याचा हा अत्यंत स्तुत्य असा उपक्रम होय. अशा उपक्रमातून आपण अगदी कौटुंबिक स्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत, आपल्या सभोवती असलेल्या आई, बहीण, पत्नी, मैत्रीण, शेजारीण, सहकारी, अधिकारी अशा विविध नात्यांतील सर्व स्त्रियांप्रति कृतज्ञता आणि आदर व्यक्त करतो. असे कार्यक्रम सर्व समाजाला एका दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरित करीत असतात. पण अनेकदा ही वरवरची मलमपट्टी ठरते. कारण असे उपक्रम अनेकदा सामाजिक दृष्टिकोनात मूलभूत बदल करण्यात अपयशी ठरतात. याला कारण म्हणजे कोणाच्याही मनावर सर्व प्रथम कौटुंबिक वातावरण परिणाम करीत असते तसेच घरात वा कुटुंबात होणारे संस्कार अधिक खोलवर रुजतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे. मात्र, कुटुंबात होणारे संस्कार हे धर्म संकल्पनांच्या आधारेच बिंबवले जात असतात. त्यामुळे स्त्रियांचे योगदान तसेच त्यांचे कौटुंबिक व सामाजिक स्थान हे त्या लोक समूहाच्या धर्म संकल्पनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. आज तरी स्त्रीला बरोबरीचेच नव्हे तर वरचढ स्थान देणाऱ्या संकल्पना फक्त हिंदू धर्मातच आहेत, हे अभिमानाने सांगायला हवे. त्याच वेळी इस्लाम धर्मात मात्र स्त्रीचे स्थान अत्यंत हीन दर्जाचे ठरवलेले आढळते. इस्लाम धर्मात जर स्त्रीला आदराचे स्थान दिलेले नसेल तर मुस्लिम समाजातही हे स्थान हीन दर्जाचेच असणार आहे. सगळ्यात पहिला मुद्दा म्हणजे इस्लाममध्ये स्त्रीला भोगवस्तू समजले आहे. 'सारे जग उपभोगण्यासाठी आहे, परंतु त्यातील सर्वांत उत्तम वस्तू म्हणजे चांगली स्त्री' असे पैगंबरांचे हदिसच्या संदर्भातील सांगितले जाणारे वचन, अरुण शौरी यांनी त्यांच्या 'वर्ल्ड ऑफ फतवाज' या पुस्तकात पृष्ठ ३५२ वर दिलेले आहे. यावरून स्त्री ही जगातील सर्वोत्तम उपभोग्य वस्तू आहे, अशी इस्लामची धारणा आहे. यामुळे मग सर्वसाधारण सामाजिक धारणा हीच बनते. इस्लामनुसार स्त्रीला जन्नत म्हणजे स्वर्ग मिळूच शकत नाही. स्त्रिया कितीही धर्मपरायण असल्या, त्यांनी आपल्या कुटुंबाकरिता अथवा समाजाकरिता उच्चतम योगदान दिले असले, तरी



त्यांच्यासाठी जन्नतमध्ये म्हणजे स्वर्गात जागा नाही. याला केवळ एकच अपवाद आहे. जर एखाद्या स्त्रीचा तिचा नवरा तिच्यावर खूश असतानाच मृत्यू झाला, तरच तिला स्वर्गप्राप्ती किंवा जन्नतमध्ये प्रवेश मिळतो, अन्यथा नाही. म्हणजे मुळात स्त्रीला स्वर्गात जागा नाही; फक्त अपवाद म्हणूनच त्यांच्या नशिबात जन्नत आहे. अर्थात सर्वसाधारण नियम स्त्रियांना जन्नतमध्ये स्थान नाही असाच आहे.

दुसरे म्हणजे स्त्रियांनी त्यांची दृष्टी नेहमीच जमिनीकडे ठेवली पाहिजे तसेच आपल्या लज्जा स्थानांचे, त्यावर आच्छादन घेऊन रक्षण केले पाहिजे. हे आच्छादन, आपला साजशृंगार परपुरुषांना दिसणार नाही असे असावे. म्हणजे 'बुरखा' हेच योग्य अंग आच्छादन ठरते. हे आच्छादन काही ठरावीक पुरुषांचा अपवाद सोडल्यास इतर पुरुषांपुढे दूर करू नये, असे कुराण सांगते. (सूरा क्र. २४, आयत क्र. ३१) म्हणजे स्त्रीने सर्व परिस्थितीत नम्रता धारण करावी व सतत लज्जास्थानांचे रक्षण करण्यासाठी शरीरावर आच्छादन ठेवले पाहिजे. त्यांनी आपला तळहात व चेहरा इतर पुरुषांना दिसू नये म्हणून झाकणे आवश्यक आहे. इथे स्त्रीला व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य नाकारलेले दिसते. त्याच वेळी मोमीन म्हणजे अल्लाह आणि पैगंबरावर श्रद्धा असलेल्या म्हणजे मुस्लिम स्त्रिया याच फक्त स्वतंत्र आहेत, असे म्हटले आहे. कारण गुलाम असलेल्या स्त्रीने मात्र आपला चेहरा वा लज्जास्थाने झाकण्यासाठी आच्छादन वापरण्यास कुराणात मनाई केली आहे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, जी स्त्री मोमीन म्हणजे मुसलमान नाही ती तसेच युद्धात जिंकलेली स्त्री गुलाम समजण्यात येत असे. स्त्रीने एकट्याने घराबाहेर पडू नये असे इस्लाम सांगतो. त्याच वेळी कोणत्याही परपुरुषाने एकट्यानेच एखाद्या स्त्री बरोबर असण्यास इस्लाममध्ये मनाई केलेली आहे. कोणत्याही स्त्रीने 'महरम' म्हणजे ज्या पुरुषाबरोबर तिचा कधीच विवाह होऊ शकत नाही असा पुरुष बरोबर असल्याशिवाय कोणताही प्रवास करू नये, अशी इस्लामची धर्माज्ञा आहे. महरम म्हणजे जन्मदाता बाप, सख्खा भाऊ असा पुरुष. म्हणजे एकीकडे स्त्रीला नखशिखांत आच्छादनात गुंडाळून इस्लाम दुसरीकडे तिला एकट्याने घराबाहेर पडण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतो. विवाह संबंधात दोघांनाही वेगळे (पुरुषाला तलाक तर स्त्रीला खुलआ) होण्याचे स्वातंत्र्य देणारा इस्लाम धर्म, पुन्हा एकत्र यायचे असल्यास मात्र अत्यंत विचित्र अशी हलालाची अट घालतो. पुरुषाने तलाक घेतल्यास त्याचा उच्चार तीन वेळेला होणे अनिवार्य आहे. मात्र पुरुषाने तलाक दिल्यास त्या स्त्रीला त्यापूर्वी दिलेले दागदागिने, जडजवाहीर परत घेण्याचा अधिकार त्या पुरुषाला नाही. एकदा तलाक झाल्यावर पुन्हा एकत्र यायचे असल्यास त्या स्त्रीचा दुसऱ्या पुरुषाशी विवाह होऊन शरीरसंबंध व्हायलाच हवेत. त्यानंतर दुसऱ्या नवऱ्याने तलाक दिला तरच ती स्त्री पुन्हा पहिल्या नवऱ्याशी विवाह करू शकते. जर कोणी एखाद्या स्त्री बरोबर लौकिक विवाह केला, पण शरीरसंबंध प्रस्थापित न करता तिला तलाक दिला तर ती अल्लाहची फसवणूक होते. कुराण असेही सांगते की, (सूरा क्र. ४, आयत क्र. ३) तुम्हाला आपण सगळ्या पत्नींशी समान न्याय करू शकू असे वाटत नसेल तर त्यांच्याशी विवाह करू नका म्हणजे एकापेक्षा अधिक पत्नी करू नका. पण जर समान न्याय करू शकतो असे वाटत असेल तर दोन-दोन, तीन-तीन, चार-चार स्त्रियांशी विवाह करायला हरकत नाही. बहुपत्नीत्वाची प्रथा सर्व धर्मांमध्ये आढळून येते. इस्लाम मात्र एका वेळेला चारपेक्षा अधिक पत्नी असू नये, असे निर्बंध सांगतो.

कुराणातील सूरा क्र. ४, आयत क्र. ३४ मध्ये असे सांगितले आहे की, पुरुष स्त्रियांचे संरक्षक असतात. अल्लाहने त्यांना स्त्रियांच्या वर नेमले आहे. शिवाय ते आपल्या संपत्तीतून खर्च करीत असतात. त्यामुळे स्त्रियांनी त्यांच्या आज्ञेत राहिले पाहिजे. पत्नीला अमानुष मारहाण करून मग दिवसअखेर तिच्याशी शरीरसंबंध करणे योग्य नव्हे. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, मारहाण करण्यावर आक्षेप नसून अमानुष मारहाण करून नंतर शरीरसंबंध करणे योग्य नाही, असे म्हटले आहे. सूरा क्र. २, आयत क्र. २२३ असे म्हणते की, स्त्री ही पुरुषांसाठी शेती आहे. या शेतीतून पुरुषांनी वंशवृद्धीचे हवे तसे पीक घ्यावे. स्त्रिया त्याच कामासाठी असतात.

जागतिक लोकसंख्येच्या २५ टक्के असलेल्या इस्लाममध्ये स्त्रीचे स्थान काय आहे, याची थोडी कल्पना वरील विवेचनावरून येते. कौटुंबिक संस्कार हे नेहमीच धर्म आणि त्यातील शिकवणूक यावर आधारित असतात. त्यामुळे जागतिक महिला दिवस साजरा करणे ही वरवरची मलमपट्टी ठरते. जागतिक पातळीवर स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी मुस्लिम धर्म संशोधन आवश्यक आहे. त्यासाठीची इस्लाममध्ये असलेली 'इत्तेहाद' ही प्रक्रिया त्वरित सुरू करणे म्हणजे महिला दिन साजरा करणे होय. अन्यथा जागतिक महिला दिवस साजरे होऊनही मुस्लिम महिला 'दीनच' राहतील, याची खात्री बाळगावी. ■

९८८१२४२२२४

## वेध

**विजय कुळकर्णी**

# भारताकडून २०२३ च्या विश्वचषकाचा बदला!

मंगळवारी भारताने दुबईमध्ये झालेल्या चॅम्पियन चषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून दणदणीत पराभव करून अंतिम फेरी गाठली. या सामन्यात भारतीय संघाने केवळ विजयच मिळविला नाही, तर वारंवार आयसीसी स्पर्धा जिंकण्यात मोठा अडथळा ठरलेल्या ऑस्ट्रेलियाला हरवून चॅम्पियन्स चषक जिंकण्याच्या आशा पल्लवित केल्या आहेत. हा सामना जिंकून भारताने २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाकडून झालेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यातील पराभवाचा एकप्रकारे बदला घेतला आहे. या सामन्यातही भारतीय गोलंदाजांसाठी सातत्याने डोकेदुखी ठरलेल्या ट्रॅव्हर्स हेडने एक वेळ सर्वांच्या मनात धडकी भरविली होती. मात्र, कर्णधार रोहित शर्माने आपले सुदर्शनचक्र असलेल्या वरुण चक्रवर्तीच्या हाती चेंडू सोपविला आणि त्याने त्याच्या पहिल्या षटकातील पहिल्याच चेंडूवर हेडला शुभमन गिलच्या हाती झेलबाद करून सामान्यात रंग भरला.



ऑस्ट्रेलियाचा कर्णधार स्मिथने एकहाती धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला. मात्र, शमीने त्याचा त्रिफळा उडवून त्याला तंबूचा रस्ता दाखविला. कैरीने तळाच्या फलंदाजांसोबत धावसंख्येला आकार देण्याचा प्रयत्न केला. पण, थर्डमॅनच्या दिशेने चेंडू ढकलून दुसरी धाव घेण्याच्या प्रयत्नात असताना श्रेयस अय्यरने केलेल्या अचूक फेकीवर तो धावबाद झाला आणि ऑस्ट्रेलियाचा डाव २६४ धावांवर शेवटच्या षटकातील ३ चेंडू शिल्लक असताना आटोपला. ऑस्ट्रेलियाने दिलेल्या २६४ धावांचा पाठलाग करण्यासाठी भारतीय संघाची आघाडीची जोडी रोहित शर्मा आणि शुभमन गिल मैदानात उतरले. रोहितने त्याच्या सवयीप्रमाणे वेगाने धावा करण्याचा सुरुवात केली. मात्र, गिल लवकर बाद झाला. त्यानंतर रोहितही जास्त वेळ खेळपट्टीवर थांबला नाही. त्यानंतर चेसमास्टर विराट कोहली आणि श्रेयस अय्यरने जवळपास प्रत्येक चेंडूवर धाव घेत धावफलक हलता ठेवला. या भागीदारीसह विराटच्या खेळीचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने केलेल्या ८४ धावांमध्ये केवळ ५ चौकार हाणले. बाकीच्या धावा त्याने एकेरी व दुहेरी केल्या. त्यावरून खेळपट्टीवर शेवटपर्यंत उभे राहून संघाला विजय मिळवून देण्याचा निश्चय स्पष्ट होतो. या सामन्यात त्याने सर्वाधिक झेल व अर्धशतक झळकाविण्याचा विक्रम नोंदविला. या स्पर्धेत पहिल्या सामन्यापासूनच भारताने सुरू केलेली विजयी लय कायम ठेवली. रोहित शर्माच्या नेतृत्वातील भारतीय संघ चॅम्पियन्स चषकाच्या या स्पर्धेत एकही सामना न हरता अंतिम फेरीत पोहोचला आहे. मात्र, या विजयाने एक बाब अधोरेखित केली, ती म्हणजे भारतीय क्रिकेट संघाला आता विजयाची सवय झाली आहे. हा भारतीय संघ २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामान्यात पोहोचला होता. त्या स्पर्धेतही साखळी सामन्यातील एकही सामना भारताने गमावला नव्हता. त्यानंतर २०२४ मध्ये झालेली टी-२० विश्वचषक स्पर्धा भारताने जिंकली. त्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला होता. तर, ही लागोपाठ तिसऱ्यांदा भारत आयसीसी आयोजित स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचला आहे. त्यावरून भारतीय संघाला विजयाची सवय झाली आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. ही बाब भारतीय क्रिकेटसाठी तर चांगली आहेच; शिवाय इतर खेळातील खेळाडूंसाठी देखील प्रेरणादायी आहे. ज्याप्रमाणे भारतीय क्रिकेट संघ सातत्याने चांगले प्रदर्शन करीत आहे. त्याप्रमाणे आपणही आपल्या खेळात चांगले प्रदर्शन करावे, अशी इतर खेळातील खेळाडूंना नक्कीच वाटत असेल. त्याचाच परिणाम म्हणून आशियाई क्रीडा स्पर्धा, ऑलिम्पिक व इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतीय खेळाडू पदक मिळविताना दिसत आहेत. तेव्हा, ९ मार्च रोजी चॅम्पियन क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना होणार आहे. हा चषक जिंकण्यासाठी भारतीय संघाला हार्दिक शुभेच्छा ! ■

८८०६००६१४९

## प्रासंगिक

# माधवी पुरी बुच आणि...

**- चंद्रशेखर टिळक**

भारतीय भांडवल बाजाराची नियंत्रक संस्था असणाऱ्या सिक्युरिटीज अँड. एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) च्या नुकत्याच सेवानिवृत्त झालेल्या अध्यक्षा माधवी पुरी बुच यांच्यावर कायदेशीर कारवाई होण्याची बातमी गेले दोन दिवस चर्चेत आहे. एका अर्थाने ते प्रकरण आजमितीला न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्याबद्दल आत्ताच काही बोलणे योग्य नाही. आणि ते शक्यही नाही. खरं म्हणजे , तसे बोलणे आवश्यकही नाही. पण सहज मनात आले की आपण शालेय जीवनापासून शिकत आलो आहोत इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. आणि आयुष्य आपल्याला शिकवत राहते की . History never says goodbye ; it only says let us meet again as nd when time permits . आजमितीला जी काही माहिती माधवी पुरी बुच प्रकरणात चर्चेत आहे आणि ज्याबाबत अगदी माधवी पुरी बुच मॅडम यांनीही नकार नोंदवलेला नाही अशी गोष्ट म्हणजे जे काही आत्ता विवादास्पद ठरवले जात असलेले व्यवहार किंवा घटना आहेत ते माधवी पुरी बुच सेबीच्या अध्यक्ष असल्याच्या काळातले नसून त्यांच्या आधीच्या काळातील आहेत. या अर्थाने हा इतिहास आहे. आणि इतिहास म्हणले की वाद आला. विवाद आला. मतभेद आला. निकराची राळ उडवणे आले. तुलना आली. तुलना म्हणले की साम्यस्थळे शोधणे आले आणि वैविध्य किंवा वेगळेपणा दाखवणारे मुद्देही आले. असे काहीसे डोक्यात घोळत असताना जाणवले की अगदी अलिकडच्या काळात चंदा कोचर प्रकरण असेच गाजले होते की ! त्याच्या मागे- पुढे राष्ट्रीय शेअर बाजाराच्या (नॅशनल स्टॉक एक्सचेंज म्हणजे एनएसइ) प्रमुख असणाऱ्या चित्रा रामकृष्ण यांच्यावरही ताशेरे उठले होते की History repeats या तिन्ही प्रकरणात कोण खरच किती दोषी आहे किंवा किती निर्दोष आहेत हे आजमितीला पूर्णार्थाने किंवा सर्वार्थाने स्पष्ट नाही.

त्यामुळे त्यातील न्यायालयीन निवडयाचा आदर राखणे अत्यावश्यक आहे. पण माधवी पुरी बुच , त्याआधीच चंदा कोचर आणि त्याही आधीचे चित्रा रामकृष्ण या तीन प्रकरणाकडे निव्वळ तीन Data set म्हणून बघितले तर फार गंमतीचे संदर्भ बिंदू मिळतात

**१.** या तिन्ही स्त्रिया आहेत. **२.** या तिघींनी त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात भरीव काम केले आहे. **३.** या तिघींनी त्यांच्या त्यांच्या संस्थेचे सर्वोच्च पद भूषविले आहे. **४.** या तिघींनी त्यांच्या संस्थेचे सर्वोच्च पद भूषवण्याआधीं आपल्या आपल्या क्षेत्रात प्रदीर्घ आणि भरीव कामगिरी केली आहे. **५.** या तिघींची अशी सर्वोच्च पदी निवड होताना त्या महिला आहेत हा निकष नव्हता तर या तिघींची त्यांच्या क्षेत्रातील भरीव कामगिरी हा निकष होता. **६.** या तिघींना त्यांचे त्यांचे सर्वोच्च पद मिळवताना त्यांच्या पुरुष प्रतिस्पर्ध्यांशी तगडी , यशस्वी स्पर्धा करावी लागली आहे. **७.** या तिघींचे वित्तीय सेवा क्षेत्रातील बहुतांश पायाभरणी ठरेल अशी कारकिर्द एक काळ ज्यांचे वर्णन Development Financial Institute ( DFI) म्हणावी अशा संस्थेत झाली आहे. चित्रा रामकृष्ण यांच्या कारकिर्दीची पायाभरणी खउ्इख मधे झाली तर चंदा कोचर आणि माधवी पुरी बुच यांच्या कारकिर्दीची पायाभरणी ICICI मधे झाली. **८.** या तिघी त्यांच्या कारकिर्दीच्या एका टप्प्यावर वेगाने पुढे येत असताना त्यांच्या कारकिर्दीला व्यवस्थापन झुकते माप देत असल्याने आमच्यावर निष्कारण अन्याय होतो असा आरोप करत या तिघींच्या समवयस्क - समपदस्थ अशा काही अधिकाऱ्यांनी नोकरी बदलली असा प्रवाद आहे. **९.** या तिघींवर सुरुवातीच्या काळात तरी त्यांच्या गॉड फादर चा शिक्का होता. चित्रा रामकृष्ण या डॉ. आर. एच. पाटील स्कूलच्या असल्याचा एकेकाळी बोलबाला होता, तर चंदा कोचर आणि माधवी पुरी बुच या के. व्हि. कामत स्कूलच्या असल्याची चर्चा असे. **१०.** अर्थात या तिघींनी नंतरच्या टप्प्यात आपल्या गुरूंचे स्मरण ठेवले नाही अशीही चर्चा होती. डॉ. आर. एच. पाटील NSE मधून निवृत्त झाल्यावर NSE च्या एका महोत्सवी कार्यक्रमात तर रवि नारायण आणि चित्रा रामकृष्ण यांनी आदरणीय डॉ. पाटील सरांचा साधा उल्लेख सुद्धा केला नव्हता. त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असणाऱ्या तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी त्यावरून या दोघांस जाहीरपणे खडे बोल सुनावले होते.

**११.** या तिघीत थोडे वेगळेपण दाखवणारे आणि त्यातही थोडे साम्य दाखवणारे असेही काही आहे. चित्रा रामकृष्ण प्रकरणात हिमालयीन योगी आहे. पण हे योगी त्यांचे पतीराज असल्याचा मात्र उल्लेख नाही. चंदा कोचर यांनी व्हिडिओकॉन समूहाला केलेल्या आर्थिक साहाय्यात त्यांच्या पतीराजांचाही सहभाग असल्याची चर्चा आहे. माधवी पुरी बुच यांच्या प्रकरणातही त्यांच्या पतीराजांचा सहभाग असल्याची प्राथमिक चर्चा आहे. **१२.** या तिघींपैकी चित्रा रामकृष्ण आणि चंदा कोचर यांना तुरुंगवास भोगावा लागला होता. माधवी पुरी बुच हे समीकरण आजमितीला न्यायालयीन प्रक्रियेच्या अगदीच प्राथमिक पातळीवर आहे. **१३.** माधवी पुरी बुच यांचे नाव या प्रकरणा आधी हिंदेनबर्ग सारख्या परदेशी संस्थेच्या अहवालात आले होते. असा काही प्रकार चित्रा रामकृष्ण व चंदा कोचर यांच्याबाबतीत घडला नव्हता.

### 'ट्रॅफिक मित्र' सेवा स्तुत्य उपक्रम, पण मनुष्यबळाचे काय?




नागपूर वाहतूक पोलिसांनी नुकताच व्हॉट्सॲप क्रमांक ८९७६८९७६९८ कार्यान्वित केला आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांचे फोटो, तसेच वाहतुकी संबधित समस्या सामान्य नागरिक याद्वारे पोलिसांकडे पाठवू शकतात. पाठवलेल्या फोटोंद्वारे पोलिस कारवाई करतील असेही सांगितले गेले आहे. हा निश्चितच स्तुत्य उपक्रम आहे. बेदरकार वाहनचालक वाहतूक नियम मोडून इतरांचाही जीव धोक्यात घालतात. त्यामुळे सामान्यांनी या व्हॉट्सॲप क्रमांकाचा वापर जरूर करावा. समाजात सध्या गुंड प्रवृत्तीही एवढी बोकाळली आहे की या प्रवृत्तीचा एखादा नियम मोडणारा वाहनचालक माहिती घेऊन फोटो पाठविणाऱ्याला त्रास देण्याचीही शक्यता नाकारता येत नाही म्हणून पोलिस आयुक्तालयाने या बाबतीत गोपनीयता बाळगणे गरजेचे आहे तरच सामान्यजन निर्धास्त होऊन मदत करतील.

याच निमित्ताने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनाही एक नम्र विनंती आहे की, ट्रॅफिक मित्र किंवा सीसीटीव्ही कॅमेरांद्वारे बेदरकार वाहनचालकांवर कारवाईने प्रश्न सुटणार नाहीत कारण वाहतूक पोलिस जेव्हा चौकात उपस्थित असतो तेव्हा नियम मोडणारी व्यक्ती जरा सजग असते आणि वाहतूक व्यवस्था बरी चालते. परंतु वाहतूक पोलिसांचे संख्याबळ एवढे तोकडे आहे की वाहनचालकांवर वचक नाहीच. ही परिस्थिती नागपुरात तर आहेच. शासन तिजोरीवर जरी ताण आलेला आहे, तरीही पोलिस खात्याच्या मनुष्यबळाकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. कारण शहरातील असंख्य वाहने आणि अस्ताव्यस्त वाहतूक यावर फक्त सीसीटीव्हीने नियंत्रण मिळवणे अशक्य आहे.

**राम राजे**/ ९४२१७७९९४५

## वाचक पत्रे

### लव्ह जिहादविरोधी कायद्यासोबतच धर्मशिक्षणाची गरज!

नुकताच महाराष्ट्रात लव्ह जिहादविरोधी कायद्याला मंजुरी मिळाली आहे. लवकरच हा कायदा अस्तित्वात येईल. लव्ह जिहादविरोधी कठोर कायद्याची अत्यंत आवश्यकता असताना शासनाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. लव्ह जिहाद म्हणजे हिंदू तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, त्यांच्यासोबत विवाह करून त्यांचे धर्मांतर करणे. लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदू तरुणींना फसवून हिंदूंचा वंशविच्छेद करणे हे जिहादी प्रवृत्तींचे मुख्य लक्ष्य आहे. यासाठी मुस्लिम तरुणांना प्रशिक्षण दिले जात असल्याचे वृत्तही आहे. मात्र, आज केवळ मुस्लिम तरुणच नव्हे, तर मुस्लिम तरुणीदेखील हिंदू तरुणींचे धर्मांतर करण्यासाठी विविध मार्ग अवलंबत आहेत.

त्यातीलच एक प्रकार म्हणजे मुंबईतील बांद्रा बस स्टॅण्डवर काही मुस्लिम तरुणी हिंदू तरुणींना फॅशनच्या नावाखाली हिजाब घालण्यासाठी प्रवृत्त करत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे, धर्माभिमान नसलेल्या काही हिंदू तरुणीही 'हिजाब घातल्यावर चांगले आणि आरामदायी वाटले,' असे लाज न बाळगता सांगत आहेत. त्यामुळे आपल्या धर्मानुसार न वागता अन्य धर्माचे समर्थन करणारी पिढी निर्माण होत असल्याची ही गंभीर बाब हिंदू समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

**प्रिया बागडदेव**/ छिंदवाडा

### देशाच्या एआय क्षमतेत वाढ होणे आवश्यक

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय हे आधुनिक जगाच्या प्रगतीचे अधिष्ठान झाले आहे. चीन व अमेरिका या तंत्रज्ञान क्षेत्रातील महाशक्तीशी स्पर्धा करण्यासाठी अलिकडेच भारताने स्वतःचा एआय चॅटवाट विकसित करण्याची घोषणा केली. भारतातील लार्ज लँग्वेज मॉडेल पुढील दहा महिन्यात तयार होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. हे मॉडेल संपूर्ण भारतीय भाषांमध्ये कार्यक्षम असून तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वतंत्र ओळख निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल ठरणार आहे. मानवी संवादाचे अनुकरण करणे आणि आपल्याला प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, गप्पा मारण्यासाठी तयार केलेली ही एक प्रकारची कृत्रिम बुद्धिमत्ता असते. एखाद्या हुशार आणि कल्पक मित्राप्रमाणे हा चॅटवाट आपल्यासोबत संवाद साधतो. आपल्या गरजेनुसार अचूक माहिती पुरवतो आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जीवन सुलभ करतो.

भारताचा हा स्वदेशी एआय चॅटवाट नवा अध्याय आहे. तो आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल देखील आहे. देशातील भाषा, संस्कृती आणि लोकांच्या गरजांसाठी तंत्रज्ञानाचा वापर हा या प्रकल्पाचा मुख्य गाभा आहे. ■

**प्रा. मधुकर चुटे**/ ९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
कृषीभारत



# आंबा मोहोराचे संरक्षण



**फुले मोहोर संरक्षण :** आंबा मोहोर संरक्षणासाठी क्रायसोपली कार्निया या परोपजीवी किडीच्या १ ते १५ हजार अळ्या प्रति हेक्टर झाडावर सोडाव्यात अथवा व्हर्टिसिलियमलेकॅनी या बुरशीवर आधारित कीटकनाशक ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारावे किंवा कार्बारिल (५० टक्के) २० ग्रॅम अधिक पाण्यात मिसळणारे ८० टक्के गंधक हे २० ग्रॅम प्रति दहा लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

**आंबा मोहोर संरक्षणाचे वेळापत्रक :**

१) ऑक्टोबरचा तिसरा आठवडा क्विनॉलफॉस २५ टक्के २० मिली + सायपरमेश्रीन १० टक्के ५ मिली + डायथेन एम-४५ ३०ग्रॅम+ १० लिटर पाणी.

२) १ ते ५ नोव्हेंबर दरम्यान स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम+ कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम+ इमामेक्टीन बेझोएट ५ ग्रॅम+ १ लिटर पाणी.

३) १५ ते २० नोव्हेंबर दरम्यान मिथिल डिमिटॉन २ मिली + ८ टक्के सल्फर २० ग्रॅम+ १ लिटर पाणी.

४) १ ते ५ डिसेंबर दरम्यान डायक्लोरोव्हॉस २० मिली + प्रोपिकोनॅझॉल ५ मिली + डायकोफॉल २ मिली + १ लिटर पाणी.

५) २० ते २५ डिसेंबर दरम्यान कार्बन्डॅझीम १ ग्रॅम+ स्पिनोसॅड ५ मिली + १० लिटर पाणी

६) फळे साधारणपणे ज्वारीच्या आकाराची झाल्यानंतर जिब्रेलीक ॲसीड १ ग्रॅम अएॅसिटोन ६० मिली किवा अल्कोहोल १०० मिली + १ किलो युरिया अचिलेटेड झिंक २५० ग्रॅम+ १ लिटर पाणी.

**करपा :** रोगाचा प्रादुर्भाव जुन्या पानांपेक्षा नवीन पानांवर जास्त होतो. पानांची रोगग्रस्त देठे काळी पडतात, पाने खाली वाकतात, लक्षण दिसून येते. काही वेळा डागांमुळे संपूर्ण फळ पडते. डागांवर खोल चिरा निर्माण होतात. बुरशी फळात खोल शिरते व फळे नासतात.

**नियंत्रण:** या रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डेझीमएक ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड २.५ ग्रॅमप्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**बांडगुळे:** जुन्या झाडांवर बांडगुळे मोठ्या प्रमाणावर वाढतात. फांद्यांना अन्नपुरवठा न झाल्याने फांद्या सुकतात, उपाय म्हणून संबंधित फांद्या छाटून टाकाव्यात.

**भुरी:** आंबा फळपिकावरील फारच नुकसानकारक असा हा रोग आहे. या रोगामुळे मोहरावर व दांड्यावर कवकाची पांढुरकी वाढ होते. रोगाचा प्रसार वा-यामुळे होतो. या बुरशीची बीजे कोवळ्या मोहोरावर किंवा पालवीवर उगवतात.

त्यांची मुळे मोहोराच्या पेशींमध्ये शिरून अन्नरस शोषतात, सुरुवातीला रोगाची लागण मोहोराच्या शेंड्याच्या भागात होऊन नंतर इतरत्र पसरते. या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणत झाल्यास आंब्याच्या मोहोराचे जवळपास ७ ८० टक्के नुकसान होऊ शकते.


**नियंत्रण :** प्रादुर्भावग्रस्त झाडावर हेक्झाकोनॅझोल ५ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



# डाळिंब आणि पेरुपासून क्रश

**डाळिंब आणि पेरू या फळांपासून बनविलेले क्रश हे पचनास सोपे तसेच गुणकारी व शरीरासाठी आरोग्यदायी असते. क्रश या पेयामध्ये एफ.पी.ओ.नुसार २५ टक्के फळांचा लगदा, ३.५ टक्क्यांपेक्षा कमी आम्लता आणि ५५ ब्रिक्स इतके साखरेचे प्रमाण असले पाहिजे. या फळांपासून बनवलेले क्रश हे बाजारात असलेल्या विविध कार्बोनेटेड पेथांपेक्षा उत्तममानले जाते. कारण यामध्ये शरीरासाठी लागणारी पोषकतत्त्वे भरपूर प्रमाणात आढळतात.**

**प्रक्रिया उद्योग**




**डाळिंब:-** डाळिंबामध्ये आम्लपदार्थ, साखर, जीवनसत्त्वे, खनिजे ही भरपूर प्रमाणात आढळतात. डाळिंबाचा रस हा आनुवंशिकतेने येणा-या मधुमेह आजाराला बरा करू शकतो.

डाळिंबामध्ये भरपूर प्रमाणात ॲन्टीऑक्सिडंट आढळतात. डाळिंबाचा रस ह्या रक्तदाब आणि हृदयविकारासारख्या आजाराला दूर ठेवतो. त्वचेवर तेज येण्यासाठी आणि स्मृती वाढविण्यासाठी देखील डाळिंबाचा रस उपयोगी पडतो.

**पेरू:-** पेरू या फळामध्ये 'क' आणि 'अ' या जीवनसत्त्वांचे प्रमाण भरपूर आढळते. तसेच लोह फॉस्फरस आणि कॅल्शिअमसारखी खनिजे आढळून येतात. तसेच, संत्राच्या फळापेक्षा पाच पट जास्त 'क' जीवनसत्त्व आढळून येते. पेरू हे फळ कर्करोग, मधुमेह या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. पेरु हे फळ वजन कमी करण्यास मदत प्रक्रेयि :

**अ) डाळिंबाचा रस काढण्याची प्रक्रिया:-** परिपक डाळिंब स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावे. डाळिंबाची साल बाजूला काढून दाणे वेगळे करावेत. त्या द्रण्यांना दाब देऊन रस वेगळा करावा. ह्या । रस गाळून घ्यावा.

**ब) पेरूचा लगदा काढण्याची प्रक्रिया:-** परिपक पेरु स्वच्छ पाण्याने धुऊन घ्यावेत. पेरुचे छोटे-छोटे काप करावेत. त्या तुकड्यांचा लगदा करावा. तो लगदा चाळून घ्यावा. लगद्यापासून बिया वेगळ्या कराव्यात.



**क) क्रश बनविण्याची प्रक्रिया:-** डाळिंबाचा रस आणि पेरुचा लगदा एकत्र करावा. साखर, पाणी, सायट्रिक आम्लाचा उपयोग करून पाक तयार करावा. हा पाक डाळिंबाचा रस आणि पेरुचा लगदा यासोबत एकत्र करावा. या मिश्रणाला मंद आचेवर ५५ ब्रिक्स इतका टी.एस.एस. येईपर्यंत ठेवावे. हे पेय गरम असतानाच बाटल्यांमध्ये भरुन ठेवावे. या बाटल्यांमध्ये भरलेल्या पंथाला पाश्चराईज करावे. पाश्चराईज केल्यानंतर त्याला थंड करावे. थंड केलेल्या बाटल्यांना पुढील वापरासाठी साठवून ठेवावे.



**ऑर्किड फ्लॉवर खूप सुंदर आहे. त्याचे स्वरूप, रंग, आकार आश्चर्यकारक आहे आणि दीर्घकाळ ताजे राहते. भारतात ऑर्किडच्या १२०० हून अधिक प्रजाती आढळतात. ऑर्किडच्या फुलांना बाजारात चांगला भाव मिळतो. अशा परिस्थितीत, जर तुम्ही त्याची लागवड केली तर हा तुमच्यासाठी खूप फायदेशीर सौदा ठरू शकतो.**


# ऑर्किड फ्लॉवरची लागवड

बदलत्या रंग आणि आकारामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही ही फुले चांगली विकली जातात. चेन्नई, कोची, बंगळुरू, मुंबई आणि पुणे यांसारख्या भारतातील मोठ्या शहरांमध्ये व्यावसायिक ऑर्किड फार्म्सची स्थापना करण्यात आली आहे.

ज्यामुळे भारतात उगवलेल्या या फुलांनी आंतरराष्ट्रीय फुलांच्या बाजारपेठेत स्वतःसाठी एक विशेष स्थान निर्माण केले आहे. काळी चिकणमाती माती ऑर्किड लागवडीसाठी योग्य मानली जाते. हायड्रोपोनिक्स सारख्या शास्त्रोक्त पध्दतीनेही तुम्ही त्याची लागवड करू शकता. चांगले फुलण्यासाठी चांगली ओलसर माती आवश्यक आहे. ऑर्किड रोपासाठी योग्य पोषण आणि पाणी आवश्यक आहे. यासाठी कुजलेल्या झाडाची साल आणि गांडुळ खताचा वापर खत म्हणून करता येतो.

याशिवाय तुम्ही कॅल्शियमनायट्रेट, अमोनियमनायट्रेट आणि लोह पाण्यात विरघळवून वनस्पतींसाठी खत म्हणून वापरू शकता. ऑर्किडच्या फुलांना शिंपडण्याच्या पद्धतीने सिंचन केल्यास जास्त फायदा होतो. या उन्हाळ्यात सकाळी आणि संध्याकाळी पाणी द्यावे लागते. ि

हवाळ्यात तुम्ही एकदा पाणी देऊ शकता. ऑर्किडला कमी पाणी लागते. ऑर्किड फुलांना २५ ते ३० अंश तापमान आवश्यक असते. त्याच्या फुलांच्या विकासासाठी अधिक आर्द्रता आवश्यक आहे. ऑर्किड फुलांची काढणी फक्त संध्याकाळीच करावी कारण यावेळी फुले पूर्ण बहरलेली असतात. सकाळी फुले कोमेजतात. ऑर्किडची फुले फुलल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी सुकायला लागतात. त्याच्या देखभालीसाठी कोल्ड स्टोरेज आवश्यक आहे.



# गाजर लागवड

**गाजराचा उपयोग आहारात भाजी म्हणून किंवा कच्ची खाण्यासाठी केला जातो. जनावरांचे खाद्य म्हणूनही केला जातो. गाजरामध्ये अ जिवनसत्व भरपूर प्रमाणात असल्यामुळे त्याचा आहारात नियमित उपयोग केल्यास डोळयांचे आरोग्य उत्तम राहून दृष्टीदोष होत नाही. गाजराचा उपयोग सूप, सॅलड, लोणची, हलका, जॅम इत्यादी पदार्थ तयार करण्यासाठी करतात. गाजराच्या चकत्या करुन सुकवून त्या साठविल्या जातात.**



**हवामान आणि जमीन-** गाजर हे थंड हवामानात वाढणारे पिक आहे. गाजराला आकर्षक रंग येण्यासाठी तापमान १५-२० अंश से. असावे लागते. ऑक्टोबर महिन्याच्या शेवटी व नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात गाजराची लागवड केल्यास जास्त उत्पादन मिळून गाजराचा आकार आणि रंग चांगला राहतो. उत्तम वाढीसाठी १८ ते २४ अंश से. तापमान अतिशय पोषक आहे. गाजर हे जमिनीत वाढणारे मूळ आहे. म्हणून गाजराची वाढ व्यवस्थित होण्यासाठी लागवडीसाठी निवडलेली जमिन मऊ भुसभुशीत असावी भारी जमिनीची मशागत व्यवस्थित करुन जमिन भुसभुशीत करावी. गाजराच्या लागवडीसाठी गाळाची आणि पाण्याचा उत्तम निचरा होणारी, सामु ६ ते ७ असणारी जमिन निवडावी.

**सुधारीत जाती-** पुसा केसर, नानटीस, पुसा मेधाली या गाजराच्या सुधारित जाती आहेत.

**हंगाम-** रब्बी हंगामातील गाजरे जास्त गोड आणि उत्तम दर्जाची असतात. रब्बी हंगामातील लागवड ऑगस्ट ते डिसेंबर तर खरीप हंगामातील लागवड जून ते जूलै महिन्यात करतात.

**लागवड पध्दती-** जमिन खोल उभी - आडवी नांगरुन घ्यावी. जमिन सपाट करुन घ्यावी. बी सरीवरंब्यावर पेरावी. दोन वरंब्यातील अंतर ४५ सेमी ठेवावी बियाची टोकून पेरणी करतांना ३० ते ४५ सेमी अंतरावर सरी ओढून दोन्ही बाजूंनी १५ सेमी अंतरावर टोकन पध्दतीने लागवड करावी. पाभरीने बी पेरतांना दोन ओळीत ३० ते ४५ सेमी अंतर ठेवावी आणि नंतर विरळणी करुन दोन रोपातील अंतर ८ सेमी ठेवावे. एक हेक्टर क्षेत्रासाठी गाजराचे सुमारे ४ ते ६ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी बियाणे उगवून येण्यास पेरणीनंतर १२ ते १५ दिवस लागतात. पेरणीपूर्वी बियाणे २४ तास पाण्यात भिजत ठेवल्यास हा काळ कमी करता येतो.

**खते आणि पाणी व्यवस्थापन-** दर हेक्टरी ८० किलो नत्र ६० किलो स्फूरद आणि ६० किलो पालाश द्यावे. नत्राची अर्धी मात्रा आणि स्फूरद व पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीपूर्वी द्यावी. नत्राची उर्वरित अर्धी मात्रा लोगवडीनंतर २० दिवसांनी द्यावी. बियांची उगवण चांगली होण्यासाठी जमिन तयार झाल्यावर वाफे आधी ओलावून घ्यावेत आणि वाफसा आल्यावर बी पेरावे. पेरणी केल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे.

हिवाळयात ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. गाजर काढणीपूर्वी १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे म्हणजे गाजरात गोडी निर्माण होते. पाण्याचे प्रमाण जास्त झाले तर गाजरात तंतुमय मुळांची वाढ जास्त होते.

**कीड रोग आणि त्यांचे नियंत्रण-** गाजराच्या पिकावर साडया भुंगा (कॅरट विव्हिल) सहा ठिपके असलेले तुडतुडे आणि रूटफलाय या किडीचा उपद्रव होतो. सोंडया भुंगा आणि तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १० मिली मेलॅथिऑन मिसळून फवारावे. गाजरावर रूटफलाय या किडीची प्रौढ माशी गर्द हिरव्या ते काळसर रंगाची असते. या किडिच्या अळया पिवळसर पांढऱ्या रंगाच्या असून त्या गाजराची मुळे पोखरुन आत शिरतात आणि आतील भाग खात त्यामुळे गाजराची मुळे वेडीवाकडी होतात आणि कुजतात. गाजराची पाने सुकतात. या किडीच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात ३ मिली डायमेथॉएट मिसळून फवारावे. गाजराच्या पिकावर करपा, भुरी, मर पानांवरील ठिपके इत्यादी रोंगाची लागण होते.

**काढणी उत्पादन आणि विक्री-** गाजराची काढणी बियाणाच्या पेरणीनंतर ७० ते ९० दिवसात करतात. गाजरे चांगली तयार व्हावीत म्हणून काढणीपूर्वी पिकाला १५ ते २० दिवस पाणी देण्याचे बंद करावे. कुदळीने खोदून हाताने उपटून किंवा नागराच्या ससाहारूयाने गाजराची काढणी करावी. गाजरावरील पाने कापून गाजरे पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावीत. लहान मोठी गाजरे आकारानुसार वेगळी करावीत. गाजराचे उत्पादन हेक्टरी ८ ते १० टन इतके मिळते.

# शेळ्या-मेंढ्यांना होणाऱ्या फुट रॉट

**फुट रॉट हा शेळ्या मेंढ्यांमध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य आजार आहे. जो त्यांच्या खुरांवर परिणाम करतो. फुट रॉट या आजारामध्ये शेळ्या आणि मेंढ्यांचे पाय कुजतात. या आजारामध्ये जनावराचे वजन कमी होवुन उत्पादन कमी होते, आणि योग्य उपचार न मिळाल्यास जनावरांचा अकाली मृत्यू होतो.**



**या आजाराची लक्षणे:-**

पाय कुजलेल्या शेळ्यांमध्ये वेदनेमुळे अस्वस्थता जाणवेल, प्रभावित खुर सुजतात आणि स्पर्शास कोमल लागतात. गंभीर प्रकरणांमध्ये सूज पाय वर वाढू शकते ज्यामुळे जनावरे लंगडत चालु लागतात.

फूट रोटमुळे खुरांमधुन खराब वास येतो, ज्यामुळे प्रभावित खुरातील बॅक्टेरिया वाढीस लागतात. खुरांना तडे गेलेले किंवा खुर खराब झालेले दिसू शकतात आणि त्याचे पृष्ठभाग खडबडीत असू शकते. फूटरोटमुळे प्रभावित खुरातून स्त्राव होऊ शकतो, जे संसर्गाचे महत्वाचे लक्षण असू शकते. पाय कुजलेल्या शेळ्या उभे राहण्यास किंवा चालण्यास अनिच्छा दाखवत असतील, तर वेदना तीव्र असू शकतात. संसर्ग पसरण्यापासून आणि शेळ्यांमध्ये अधिक गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्यापासून रोखण्यासाठी शक्य तितक्या लवकर पाय कुजण्याचे निदान आणि उपचार करणे महत्वाचे आहे.

**या आजारावर नियंत्रण:-**

पशुवैद्यांच्या सल्ला घेवुन वेळोवेळी जनावरांची नखे छाटावीत.

कळपात समाविष्ट करण्यापुर्वी नव्या जनावरांना फूटरॉट आणि इतर जुनाट आजारा नसल्याची खात्री करुन घ्यावी.

जनावरांच्या वाहतुक वाहनांचे निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे.

फूटरॉट संसर्गचा धोका कमी होण्यासाठी दर ५ ते ७ दिवसांनी १० टक्के झिंक सल्फेटच्या पण्यामध्ये मेंढ्यांना १५ मिनिटांपर्यंत उभे राहण्यास भाग पाडावे.

बाधित जनावरे बरी होईपर्यंत कोरड्या जागेत ठेवावीत, कारण ओलाव्यामुळे हा संसर्ग वाढतो. त्याचबरोबर पशुवैद्यांकडुन योग्य तो सल्ला घ्यावा.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शुक्रवार, ७ मार्च २०२५

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

## बर्ड फ्लूचा संसर्ग रोखण्यासाठी कोम्बिंग ऑपरेशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

ढोकी गावात आढळलेल्या बर्ड फ्लू (H5N1) संसर्गाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तातडीची कारवाई हाती घेतली आहे. प्रभावित भागाच्या १० किमी त्रिज्यातील क्षेत्र सतर्क क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

संसर्ग रोखण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने जलद प्रतिसाद दल (RRT) कार्यरत केले असून, परसबागांमधील व कुक्कुटपालन व्यवसायिकांकडील पक्ष्यांचे नियमानुसार कलिंग (नष्ट करणे) सुरू आहे. भोपाळ प्रयोगशाळेच्या अहवालानुसार २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बर्ड फ्लूची पुष्टी झाली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी जलद प्रतिसाद दल, ग्रामपंचायत, वन विभाग व आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने ५ व ६ मार्च रोजी कोम्बिंग ऑपरेशन राबवले. या मोहिमेत २९५ कुक्कुट पक्ष्यांचे कलिंग करून त्यांची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

बर्ड फ्लू हा केवळ पक्ष्यांपुरता मर्यादित नसून तो इतर प्राणी व मानवांमध्येही पसरू शकतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्रभावित क्षेत्रातील पोल्ट्री व्यावसायिक आणि परसबागांतील कुक्कुटपालन करणाऱ्या नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. ज्या नागरिकांचे पक्षी नष्ट करण्यात आले आहेत.

## संक्षिप्त वृत्त...



### प्रा.डॉ. बाबा इंगळे लिखित पुस्तकाचे प्रकाशन

**धाराशिव, दि.६ मार्च -**

आंबेवाडी येथील प्रा.डॉ. बाबा इंगळे यांनी टेक्स्ट बूक ऑफ फंडामेंटल फिजिक्स हे पुस्तक लिहिले आहे. याचा प्रकाशन सोहोळा, हैदराबादच्या प्राचार्या डॉ. राज लक्ष्मी, शाहू कॉलेज लातूरच्या डॉ. अनुजा जाधव, प्राचार्य डॉ. मासुमदार व अन्य मान्यवर यांच्या हस्ते पार पडला. या पुस्तकाचा उपयोग बी.एस्सी मध्ये शिकणार्या, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या विद्यार्थ्यांना होणार आहे. डॉ.प्रा. बाबा इंगळे हे आझाद महाविद्यालय औसा यथे कार्यरत आहेत.

### छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्याची मागणी

**नळदुर्ग, दि.६ मार्च -**

ऐतिहासिक नळदुर्ग शहरात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारावे, अशी मागणी भाजपचे बबन चौधरी यांनी धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. या निवेदनात बबन चौधरी यांनी म्हटले आहे की, नळदुर्ग नगरपालिकेने शहरात अनेक राष्ट्र पुरुषांचे स्मारक, पुतळे उभारले आहेत. त्याप्रमाणे ज्यांनी आपल्या प्राणांची बलिदान देऊन देव, देश, धर्म जीवंत ठेवला असे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा नळदुर्ग शहरात उभारावे, अशी सर्व शिवशंभु प्रेमींची इच्छा आहे. शहरातील मध्यवर्ती ठिकाण म्हणुन हुतात्मा निलया स्वामी उद्यानातील रिकाम्या जागी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारावे, अशी मागणी या निवेदनात चौधरी यांनी केली आहे.



### हॅलोकडून सर्व क्षेत्रातील महिलांचा सत्कार

**जळकोट, दि.६ मार्च -**

मुला-मुलींनी आजच्या युगात प्रत्येक क्षेत्रात यश संपादन करुन प्रगती केली पाहिजे, असे मत माजी सरपंच ज्योतिका चव्हाण यांनी केले. तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथे हॅलो मेडिकल फाउंडेशनच्यावतीने महिला दिनानिमित्त गावातील विविध क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे, दोन मुलींवर कुटुंब नियोजन केलेल्या मातांचे व लग्न होऊन शिक्षण घेत असलेल्या मुलींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका समन्वयक नागिनी सुरवसे यांनी केले. यावेळी गावातील देविदास चव्हाण, हरीचंद्र चव्हाण, छमाबाई चव्हाण, काजल चव्हाण यांच्यासह कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास राजश्री चव्हाण, शांताबाई चव्हाण, रिना चव्हाण, शांताबाई राठोड, सविता राठोड, इंदूबाई राठोड, रेवाप्पा राठोड, अरुण चव्हाण पर्यवेक्षक इंदूमती कबाडे, सुरेखा चव्हाण, महिला, विद्यार्थी उपस्थित होते.

### अवैध मद्यविक्री विरोधात पोलिसांची कारवाई

**धाराशिव, दि.६ मार्च -**

जिल्ह्यात अवैध मद्य विक्री विरोधात पोलिसांनी कठोर कारवाई करत दोन ठिकाणी छापे टाकून मोठ्या




प्रमाणात गावठी व विदेशी मद्य जप्त केले. नळदुर्ग पोलीसांनी येडोळा तांडा (ता. तुळजापूर) येथे ३ मार्च रोजी रात्री ८:३० वाजता संजय सिंध्दु राठोड याच्या ताब्यातून अंदाजे २,८०० रुपये किंमतीची ३५ लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. संशयित आरोपी हा अवैध दारू विक्रीसाठी दारू जवळ बाळगत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई केली. तर गौर (ता. कळंब) येथे ४ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.५० वाजता दत्ता मोतीराम माळी (वय ५९) याच्या घरासमोरील मोकळ्या जागेतून अंदाजे १,१२० रुपये किंमतीच्या १६ सिलबंद देशी-विदेशी मद्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या.

# सिंदफळ येथे शेतीच्या वादातून शेतकऱ्याचा निर्घृण खून

## २४ तासातच दोन आरोपी गजाआड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.६ मार्च -**

तालुक्यातील सिंदफळ येथे एका ५७ वर्षीय मुस्लीम शेतकऱ्याचा शेतीवादातून निर्घृण खून करण्यात आला आहे. मोटरसायकलच्या स्टीलच्या रॉडने मारहाण करत हा खून दि.५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सातच्या सुमारास ही घटना घडल्याचे समजते. या प्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात शेतकरी मयत सत्तार यासीम इनामदार (वय ५७) हे त्यांच्या मुलास आढळून आले आहे. सायंकाळी आपल्या शेतातील विहिरीतील मोटर सुरू करण्यासाठी गेले होते. मात्र बराच वेळ होऊनही ते परत न आल्याने त्यांचा मुलगा सोहेल इनामदार हा शेतात गेला असता, त्यांना रक्ताच्या थारोळ्यात पडलेले पाहून धक्काच बसला. त्यांच्या डोक्यात स्टीलच्या रॉडने जबर मारहाण झाल्याचे दिसून आले. तातडीने ही माहिती कुटुंबीयांना कळवण्यात आली आणि गंभीर अवस्थेत त्यांना उपजिल्हा रुग्णालयात येथे दाखल करण्यात आले.

मात्र, अधिक रक्तस्राव झाल्याने पुढील उपचारासाठी सोलापूर येथे पाठवण्यात आले परंतु डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनास्थळी पोलिसांना दारूच्या बाटल्या, सिगारेटचे पाकिटे, कुरकुरेचे पॉकेट आणि आंब्याच्या झाडाखाली गळून पडलेल्या कैऱ्या आढळून आल्या.

त्यामुळे या हत्येच्या मागे नेमके कोणते कारण आहे, घात की अपघात याचा तपास सुरू आहे.



सत्तार इनामदार यांच्या खुनाची बातमी गावात पसरतात गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले खुनातील आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे समजते. शेतीच्या वादातून हा खून झाल्याची चर्चा सिंदफळ येथील नागरिक करीत आहेत. या घटनेची माहिती मिळताच तुळजापूरचे उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. निलेश देशमुख, पोलीस निरीक्षक आण्णासाहेब मांजरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

वसीम गफुर इनामदार (वय ३५, रा. सिंदफळ) यांच्या फिर्यादीवरून गणेश घाटशिळे आणि त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध कलम १०३ (१), ३ (५) भारतीय न्यायसंहिता २०२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, मुख्य आरोपी गणेश घाटशिळे हा यापूर्वीही अनेक गुन्ह्यांमध्ये अडकलेला असून, काही दिवसांपूर्वीच पोलिसांनी त्याच्याकडून गांजा जप्त केला होता. तो सध्या जामिनावर बाहेर होता. आता त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल झाल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रकरणात पुढील तपास पोलीस निरीक्षक आण्णासोब मांजरे करीत असून, खुनाचे नेमके कारण काय हे तपासाअंती स्पष्ट होईल.

## उमरगा वासियांनी घेतला महाआरोग्य शिबिराचा लाभ



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ मार्च -**

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते शरण बसवराज पाटील यांच्या वतीने शहरातील आदर्श महाविद्यालयाच्या मैदानावर महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भगवंत खुब्बा यांच्या हस्ते करण्यात आले.

लातूर, धाराशिव जिल्ह्यातील रुग्णासाठी तपासणी पासून शस्त्रक्रिया, हृदयरोग, मधुमेह, स्त्रीरोग, नेत्र, कान, नाक आदीची मोफत तपासणी व औषधोपचार आणि दिव्यांग व्यक्तीला साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे प्रदीप राठी, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, शिबिराचे मुख्य संयोजक शरण पाटील, श्रमजीवी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विनायकराव पाटील, सचिव रामकृष्णपंत खरोसेखर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. सुरेश बिराजदार, भाजपचे जिल्हा अध्यक्ष संताजी चालुक्य, उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार गोविंद येरमे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.एस.एल. हरिदास, इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आंनत मुगळे, डॉ. उदयसिंह मोरे, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, आकाश राठी, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड, दिलीप भालेराव, ॲड.व्ही.एस. आळंगे, मल्लिनाथ दंडगे, डॉ. दामोदर पतंगे, डॉ. शरणप्पा मलंग, सतीश साळुंखे आदींची उपस्थिती होती. महाआरोग्य शिबिराचे मुख्य संयोजक शरण पाटील यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश हानेगावे यांनी केले तर प्राचार्य डॉ. दिलीप गरुड यांनी आभार मानले. या निमित्ताने शरण पाटील फौंडेशनच्या लोगोचें प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी रफिक तांबोळी, प्रा. शौकत पटेल, डॉ. राम सोलंकर, महेश माशाळकर, अनिल सगर, डॉ. अनुराधा मिरगणे, भीमाशंकर सारणे, योगेश राठोड आदींनी परिश्रम घेतले.

धाराशिव जिल्हा पत्रकार संघाची नूतन कार्यकारिणी जाहीर...

## संघाच्या अध्यक्षपदी देविदास पाठक, उपाध्यक्षपदी गोविंदसिंग राजपूत यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ मार्च -**

धाराशिव जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी देविदास पाठक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. धाराशिव जिल्हा पत्रकार संघाच्या कार्यकारिणीची मुदत संपल्याने नूतन कार्यकारिणी निवडीसंदर्भात चंद्रसेन देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी नूतन कार्यकारिणी निवडीसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्हा पत्रकार संघाची बैठक गुरुवारी (दि.६) पार पडली.

यात पत्रकार संघाची पुढील २ वर्षांसाठी नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी देविदास पाठक, उपाध्यक्ष गोविंदसिंग राजपूत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली



आहे. पत्रकार संघाचे मार्गदर्शक म्हणून कमलाकर कुलकर्णी, दिलीप पाठक-नारीकर, सयाजी शेळके, संजय पाटोळे, बाळासाहेब मुंदडा, विशाल सोनटक्के राहतील.

यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**धाराशिव, दि.६ मार्च -**जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर तालुक्यातील चार लघुपाटबंधारे प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## मांजरा शुगर इंडस्ट्रीज (कंचेश्वर) कारखाना कार्यस्थळावर सुरक्षा सप्ताह साजरा



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.६ मार्च -**

तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर इंडस्ट्रीज प्रा.लि, या कारखान्यात ५४ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे औचीत्य साधुन गुरुवारी (ता.६) कारखाना कार्यस्थळावर सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी कारखान्याचे टाईम किपर दिपक जाधव यांनी सर्व प्रथम उपस्थित सर्व कर्मचारी, कामगार यांना सुरक्षिततेची शपथ दिली. त्यानंतर सुरक्षा व इंजि. विभागातील कर्मचाऱ्यांनी वापरण्यात येत असलेल्या सुरक्षिततेच्या साधनांचा प्रात्यक्षिक करुन दाखविले.

यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे यांनी उपस्थित कर्मचारी कामगार यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपली सुरक्षा हीच कुटुंबांची सुरक्षा यामुळे सर्व कामगार व अधिकारी यांनी कारखान्यात काम करीत असताना अपघात होवु नये याची दक्षता घेवुन हेल्मेट, सेफ्टी बुट, सेफ्टी बुट यासह सर्व आवश्यक त्या सेफ्टी साधनाचा वापर करावा.

कर्मचाऱ्यांनी सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करुन विना अपघात काम केल्यास कामगारांची, कारखान्याची तसेच राष्ट्राची प्रगती होते. तसेच कामगारांनी दिलेल्या नियमावलीप्रमाणे व सुरक्षा साहीत्याचा वापर केल्यास अपघात रोखण्यासाठी मदत होते असे प्रतिपादन केले.

सुरक्षा सप्ताह कार्यक्रमासाठी सर्व खातेप्रमुख, विभाग प्रमुख व कर्मचारी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम...

## २५ अनाथ विद्यार्थ्यांचे अश्लेष मोरेंनी स्विकारले पालकत्व

### जि.प. हायस्कूल विद्यार्थ्यांची पदवीपर्यंतच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.६ मार्च -**

अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त उमरगा शहर व तालुक्यात अनेक सामाजिक उपक्रम राबवून अतिशय वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील २५ अनाथ विद्यार्थ्यांचे पालकत्व आश्लेष मोरे यांनी गेल्या सहा वर्षापासून स्वीकारले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी अश्लेष मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्याची जबाबदारी घेऊन विद्यार्थ्यांच्या आयुष्यात असेचा किरण निर्माण केला. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी भैया देवदूत म्हणून कार्य करत आहेत.

या आनंदाने आज शाळेतील विद्यार्थ्यांना अश्लेष मोरे मित्र मंडळाचे अध्यक्ष विशाल काणेकर भारत शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. सुभाष वाघमोडे, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, काँग्रेसचे अध्यक्ष अर्जुन बिराजदार, क्रीडा शिक्षक संजय कोथळीकर, सचिन बिद्री, शालेय व्यवस्थापन समितीच्या सुजाता मोरे यांच्या उपस्थितीत शालेय साहित्याचे वाटप करुन वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे, सुत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख सरिता उपासे तर आभार शिल्पा चंदनशिवे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, संजय रुपाजी, सदानंद कुंभार, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील, वनमाला वाले, सुनिता राठोड यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना फसवून त्यांचा तळतळाट सरकारने घेऊ नये : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.६ मार्च -**

निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांना शून्य रुपये वीजबिल देऊन त्यात तिघांचे फोटो टाकले निवडणुकानंतर त्याच शेतकऱ्यांना एक लाख बारा हजार रुपये वीजबिल देण्यात येतंय. शेतकऱ्यांना फसवून सरकारने त्यांचा तळतळाट घेऊ नये असा हल्ला आमदार कैलास पाटील यांनी विधानसभा सभागृहात चढविला. ते अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्यपाल यांच्या अभिभाषणावर बोलत होते.

यावेळी आ. पाटील म्हणाले, महापुरुषांच्या नावाने फक्त राजकारण होणं हे दुर्देवी आहे. महापुरुषांचा अपमान करण्याची हिंमत कुणी करणार नाही असं शासन कराव. हे करताना फक्त यामध्ये राजकारण करु नये असे मत मांडले. धाराशिव येथील कौडगाव एमआयडीसी मध्ये टेक्निकल टेक्सटाईल सुरु करण्याची घोषणा उद्योगमंत्री यांनी केली पण त्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आलेला नाही.

हा प्रकल्प कधीपर्यंत सुरु होणार याची विचारणा आमदार पाटील यांनी केली. तसेच धाराशिव येथील एमआयडीसीमध्ये भूखंड घ्यायचा असेल तर त्याचा दर प्रति चौरस मीटरला एक हजार ६५० रुपये इतका आहे. तर कुरकुंभ येथे हा दर अवघा साडेचारशे रुपये आहे. मग एवढा फरक असल्यावर कोणता उद्योग जिल्ह्यात येईल असा प्रश्न पाटील यांनी विचारला. हा दर कमी करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. निवडणुकीच्या अगोदर सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना आणली पण नंतर ही योजना बंद झाली. शिवाय दोन महिन्याचे वेतनही त्या युवाना मिळालेलं नाही.

ही योजना पूर्ववत सुरु ठेवून त्यांचे वेतन द्यावे अशी मागणी आ. पाटील यांनी केली. शक्तिपीठ महामार्गला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध झाल्याने निवडणुकी अगोदर या मार्गाला स्थगिती देण्यात आली.

सरकार आल्यानंतर पुन्हा हा मार्ग होणार असल्याच सरकारने सांगितले आहे. ८६ हजार कोटी रुपये एवढा खर्च यासाठी होणार आहे. तोच खर्च मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पसाठी केल्यास या भागाचा आर्थिक विकास होईल, असेही मत आमदार पाटील यांनी मांडले. मागेल त्याला सौरपंप म्हणायचं मात्र त्याला टार्गेट द्यायचं ही कोणती पद्धत? जिल्ह्यात आतापर्यंत एकही पंप कार्यान्वित झालेला नसल्याच पाटील यांनी सांगितलं. जिल्ह्यात ५८ हजार शेतकऱ्यांनी यासाठी अर्ज केला त्यातील फक्त १५ हजार अर्ज मंजूर झाले पण एकही पंप अजून बसलेला नसल्याच सांगून सरकारचे लक्ष्य त्यांनी वेधले.



घरकुल देताना रक्कमेच्या बाबतीत शहरी व ग्रामीण असा भेद केला जातो. शहरी भागासाठी अडीच लाख तर ग्रामीणसाठी अगोदर दिड लाख व आता वाढवून दोन लाख केला आहे.

शहरी व ग्रामीण मध्ये बांधकाम करण्यासाठी लागणार साहित्याचे दरात फरक असतो का? असा प्रश्न विचारून त्यांनी उलट ग्रामीण खर्च जास्त होतो असं म्हटले. ग्रामीणमधून शहरातून हे साहित्य खरेदी करावं लागत त्याची वाहतूक वाढते त्यामुळं ग्रामीणची रक्कम वाढवून ती तीन लाख करावी अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. पिककर्जबाबत सुद्धा शासन नुसत्या घोषणा करत पण प्रत्यक्षात वास्तव वेगळं असल्याच आमदार पाटील यांनी दाखवून दिलं. पिककर्ज देताना सीबील चा अडथळा येणार नसल्याच सरकारने स्पष्ट केल पण जेव्हा राज्यस्तरीय पिक समितीचे इतिवृत पाहिलं तेव्हा त्यात तसा उल्लेख नाही.

त्यामुळं बँकेनी शेतकऱ्यांची नेहमीसारखी अडवणूक केल्याचं दिसून आलं आहे. आतातरी याबाबत सरकारने ठाम भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

सोयाबीन खरेदीविषयी बोलताना आ. पाटील यांनी सरकारी धोरण किती कुजकामी आहे हे दाखवून दिलं. ते म्हणाले, जिल्ह्यात ६२ ते ६७ लाख मेट्रिक टन उत्पादन झालं त्यातील फक्त ११ लाख मेट्रिक टन एवढंच सोयाबीन खरेदी झाले आहे. आता या उर्वरीत सोयाबीनचे काय असा प्रश्न त्यांनी विचारला. शिवाय सरकारकडं आम्ही खरेदी केंद्र वाढविण्याची मागणी करूनही सरकारने त्याकडे दुर्लक्ष केल्याचं त्यांनी सांगितलं.

किमान आता भावांतर योजनेतून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळावा लवकर मिळावा, अशी अपेक्षा त्यांनी सरकारकडे व्यक्त केली.

# सहकाराची जिल्ह्यात पायाभरणी व्हावी : खा. डॉ. गोपछडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ मार्च**

सहकारी संस्थांच्या निर्मितीतून स्वावलंबन व सहकार्याची पायाभरणी करणे गरजेचे आहे. सहकारामध्ये सर्वांच्या हक्काचे रक्षण करत ,पारदर्शीता महत्त्वाचे असते. यातून एखाद्या जिल्ह्याचा कायापालट होऊ शकतो. दुग्ध उत्पादन क्षेत्रात जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याला व्यक्तिगतरित्या मदत करायला मी तयार असून यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी येथे केले.

केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड ( मुदा ) लि. यांच्या सहयोगातून स्वतःच्या जागेत बायोगॅस सयंत्र बसविण्यासाठी नोंदणीकृत शेतकरी तसेच सहकारी दुग्ध संस्था प्रमुख यांची गुरुवारी दुपारी कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे झालेल्या या कार्यशाळेला उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले उपस्थित होते. तर विशेष मार्गदर्शक म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल उपस्थित होत्या. तसेच तज्ञ मार्गदर्शक म्हणून दिल्ली येथील दीनदयाळ शोध संस्थेचे अध्यक्ष प्रा.उपेंद्र कुळकर्णी, सहकारी संस्था दुग्ध छत्रपती संभाजी नगरच्या विभागीय उपनिबंधक श्रीमती कल्पना शहा, राष्ट्रीय डेअरी विकास बोर्ड ( मृदा ) आनंद गुजरातचे कार्यकारी संचालक संदीप भारती, संजय कौडगे, या ठिकाणी मार्गदर्शनासाठी उपस्थित होते.

या दोघांनी दोन सत्रांमध्ये सहकारी संस्था उभारणी, दुग्ध उत्पादन, वितरण विपणन, बायोगॅस उभारणी व उपयोगीता सर्व बारकाईने माहिती दिली. खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या पुढाकारात हा कार्यक्रम आज घेण्यात आला.



नांदेड जिल्ह्यामध्ये दुग्ध उत्पादन वाढविण्यामध्ये भरपूर वाव असून यासाठी सहकाराचा मंत्र पुढे घेऊन वाटचाल करणे आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासन या उपक्रमामध्ये आपल्या पाठीशी असून आपण याची सुरुवात करावी. जिल्ह्यातील सहकारी दूध संस्था तसेच दूध उत्पादन वाढविण्यासाठी एकत्र यावे. त्याचे प्रशिक्षण आज इथे दिले गेले. `शासन दुग्ध उत्पादनात मागे राहिलेल्या जिल्ह्यांना पुढे आणण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. आपण स्वतः या सर्व व्यवसायाचा अनुभव घेतला असून यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याला मदत करण्यासाठी तत्पर असू असे त्यांनी सांगितले. मात्र दुग्ध व्यवसाय वाढविण्यासाठीचे उद्दिष्ट मी माझ्या स्वतःला घेतल्या असून हा उपक्रम निरंतर राबविणार असल्याचे खासदारांनी सांगितले.

यावेळी उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित केले. केंद्र शासनाच्या अनेक योजना जिल्ह्यात उपलब्ध आहेत. त्याचा लाभ घ्यावा. आजच्या कार्यशाळेतून दुग्ध उत्पादनाला व सहकारी संस्था निर्मितीला गती यावी,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नांदेड जिल्ह्यातील दुग्ध उत्पादनाची सद्यस्थिती महाराष्ट्राच्या अन्य जिल्ह्याच्या तुलनेत अतिशय नाजूक आहे. दुग्ध उत्पादन क्षेत्रांमध्ये जिल्ह्याला प्रगती करायला भरपूर वाव आहे. यासाठी प्रशासन मदतीला तत्पर आहे. मात्र आपण सर्वांनी चांगल्या प्रशिक्षणातून पुढे जाऊन हे काम करावे, केवळ उद्योग व्यवसाय उभारताना शासकीय निधी मिळतो आहे, अनुदान मिळते आहे, म्हणून या व्यवसायात येऊ नका. तर प्रामाणिकपणे आपल्या उपजीविकेचे साधन या व्यवसायाला बनवायचे असेल तरच या व्यवसायात या असे आवाहनही त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनीही मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांनी या क्षेत्रात योग्य प्रशिक्षण घेऊन वाटचाल करावी, अशी सूचना त्यांनी केली. शेतकऱ्यांनी दूध उत्पादन करताना आपल्या शेतामध्ये चारा उत्पादित होईल, याकडे देखील लक्ष वेधावे. संपूर्ण व्यवसाया बाबत तांत्रिक सल्ला मात्र घ्यावा, असेही स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमरीकसिंग वासरीकर यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शेतकरी आले होते.

# माहूर येथील बाबा सोनापीर यांच्या उरुसाला सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०६ मार्च**

माहूर येथे सरकार बाबा सोनापीर यांचा उर्स तसा दरवर्षीच साजरा केला जातो मात्र यावर्षी मुस्लिम धर्मातील रमजान महिन्यातील 'रोजा' (उपवास) ठेवण्याच्या पवित्र योगकालावधीत आलेल्या सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान सरकार सोनापीर बाबा उर्फ हजरत सय्यद सनाऊल्लाह शहा आणि बाबा लंगोटबंद उर्फ हजरत सय्यद हबीबउल्लाह शाह रहेमतुल्ला आलेह यांच्या उरुसाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. यात्रोत्सवाला बुधवार दि.०५ मार्च रोजी सायंकाळी दर्गाहचे मुजावर बाबर फकीर मोहम्मद सज्जादा-नशिन साजिद उल्लाह जागीरदार आणि व्यवस्थापक समितीकडून मानाचा दरबारी शाही संदल चढवून मोठ्या भक्ती भावाने सर्वधर्मीय भाविकांच्या उपस्थितीत सुरुवात झाली.

गेल्या ५६ वर्षांपासून बाबा सोनापीर दर्गाह येथे उरुसाचे आयोजन केले जाते. या उरुसात सर्व प्रकारची दुकाने ज्यामध्ये प्रसाद, फुले, लहान मुलांना खेळण्याचे साहित्य, आकाश पाळणे,झुले,मौत का कुवां, कपडे, पादत्राणे, अत्तर,मिनाबाजार, महिलांचे बांगड्या व श्रुंगार साहित्य दुकाने,तसेच विविध खाद्यपदार्थ विक्रीची दुकाने मोठ्या प्रमाणात सजविण्यात आलेली आहेत. दि.०५ रोजी सायंकाळी ०५ वाजता परचम कुशाई आणि ०८ वाजता नंतर दरबारी शाही संदल ने सुरुवात करण्यात आली. दि.०६ रोजी धार्मिक कार्यक्रम तर दि.०७ रोजी हजरत मौलाना हसन रजा यांच्या उपस्थितीत फातेहा खानीचा कार्यक्रम होणार आहे. ८ रोजी पुन्हा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



असून, ९ रोजी दररोजच्या प्रमाणे शहरी इफ्तार सह धार्मिक कार्यक्रम ठेवण्यात आलेले आहेत.तर आनंद बेले यांच्याकडून मनोरंजनाची भरपूर साधने उभारण्यात आलेली आहेत. विशेष म्हणजे दरवर्षीप्रमाणे शहरातून मिरवणुकी द्वारे निघणारा शाही संदलचा कार्यक्रम सध्या रमजान महिना सुरू असल्याने यावर्षी रद्द करण्यात आला आहे.

उरुसात सर्व धर्मीय बांधवांनी दर्शन तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन मुजावर बाबर फकीर मोहम्मद, सज्जादा नशिन साजिद उल्लाह जागिरदार तसेच सह व्यवस्थापक मंडळांनी केले आहे. सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा नियोजन प्रमुख तहसीलदार किशोर यादव यांच्या उपस्थितीत नगरपंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, सपोनी शिवप्रकाश मुळे, एमएसडीसीएलचे अभियंता आर.बी.शेंडे यांचेसह महसूल विभाग, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा आणि आरोग्य विभाग,वनविभाग, नगरपंचायत प्रशासन, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी भाविकांना सेवा सुविधा व सुरक्षा पुरविण्यासाठी जय्यत तयारी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त



### पत्रकार राम तरटे यांना संविधान जागर पुरस्कार प्रदान

**नांदेड**-वृत्तपत्र क्षेत्रात गेल्या अनेक वर्षापासून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राम तरटे यांना संविधान अमृत महोत्सवानिमित्त संविधान जागर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .कुसुम सभागृहात काल सायंकाळी पुरस्कार वितरणाचा सोहळा थाटात पार पडला. भारतीय राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नांदेडमध्ये संविधान अमृत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना संविधान जागर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नांदेड जिल्ह्याच्या वृत्तपत्र क्षेत्रात गेल्या दीड दशकाहुन अधिक काळ निर्भीड पत्रकारिता करणारे पत्रकार राम तरटे यांना यावर्षीच्या संविधान जागर २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . कुसुम सभागृहात पार पडलेल्या संविधान जागर पुरस्कार वितरण सोहळ्यात पत्रकार राम तरटे यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला . यावेळी साहित्य संस्कृती मंडळाचे माजी सदस्य विलास सिंदगीकर , प्रफुल्ल सावंत , राजेश पावडे , महेश देशमुख तरोडेकर , डॉ. गंगाधर सोनकांबळे , डॉ. करुणा जमदाडे , सत्यपाल सावंत ,अमोल एडके यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### जर्नालिस्ट असोसिएशन नांदेड जिल्हा महासचिवपदी जावेद अहमद

**देगलूर**-देशभरातील पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या न्यूज जर्नालिस्ट असोसिएशन या राष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या 'नांदेड जिल्हा महासचिवपदी' देगलूर येथील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते जावेद अहमद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.प्रदेशाध्यक्ष सुधीर माने यांनी संस्थापक अध्यक्ष फिरोज पिंजारी, राष्ट्रीय अध्यक्ष खलील सुर्वे, राष्ट्रीय संयोजक डॉ.शरीफ बागवान व राष्ट्रीय संघटक शेखर जांभळे यांच्याशी चर्चा करीत नियुक्तीपत्र बहाल करण्यात आले आहे. या निवडीबद्दल संस्थापक अध्यक्ष फिरोज पिंजारी, राष्ट्रीय मार्गदर्शक प्रवीण कोळ आपटे, राष्ट्रीय अध्यक्ष खलील सुर्वे, राष्ट्रीय संयोजक डॉ.शरीफ बागवान, राष्ट्रीय संघटक शेखर जांभळे, राष्ट्रीय महिला अध्यक्षा सना बेगम, महासचिव मानसी गणेश कांबळे, राष्ट्रीय महासचिव अश्वनी कुमार, राष्ट्रीय सचिव अनिल पवार, सचिव अॅड.अरविंद कुमार, सचिव धवल माहेश्वरी, राष्ट्रीय सहसचिव लतेश शिंदे, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. अकबर शेख, राष्ट्रीय युवा सचिव फैजान सुर्वे, राष्ट्रीय कमिटी सदस्य किशोर कुमार मोहंती, राष्ट्रीय कोषाध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुधीर माने, हरियाणा प्रदेश अध्यक्ष हेमेंद्र कुमार शर्मा, कर्नाटक प्रदेश संयोजक रविश हेगडे, उत्तर प्रदेश महासचिव अनिस कुरेशी,उत्तर प्रदेश उपाध्यक्ष कमल शुक्ला, राजस्थान प्रदेश अध्यक्ष ओम प्रकाश जैन, ओडीशा प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद कुमार रॉय, मध्य प्रदेश सचिव अयाज हुसैन, राष्ट्रीय महिला उपाध्यक्षा फिरोजा पिंजारी, राष्ट्रीय महिला उपाध्यक्षा श्रद्धांजली रॉय, राष्ट्रीय महिला उपाध्यक्षा श्रीमती शानू माहेश्वरी, महाराष्ट्र प्रदेश महिला सचिव तनुजा गुळवी, झारखंड प्रदेश सचिव कनक सिंग, महाराष्ट्र प्रदेश संयोजक अनिल कुमार पालिवाल, रायगड जिल्हाध्यक्ष राजेंद्र शिवाजी जाधव, ठाणे जिल्हाध्यक्ष नितीन पाटणकर, अकोला जिल्हाध्यक्ष मो. जुनेद मो. युसुफ, ठाणे जिल्हा संयोजक श्रीकांत म्हात्रे, रायगड जिल्हा सचिव सागर जाधव, खालापूर तालुका अध्यक्ष सुधीर देशमुख, रोहा तालुका अध्यक्ष याकुब सय्यद, खोपोली शहर सचिव परमेश्वर कट्टीमणी, छत्रपती संभाजीनगर अध्यक्ष रविंद्र सकपाळ, हर्ष कसेरा आदींनी अभिनंदन केले आहे.



# आ. चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ मार्च**

दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आ.मोहनराव हंबर्डे यांच्या नेतृत्वामध्ये नांदेड - दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये पक्षप्रवेश केला.

यावेळी माजी आ.अविनाशराव घाटे, माजी सभापती अशोक पाटील मुगावकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रविण पाटील चिखलीकर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य गणेशराव पाटील सावळे, माधव पावडे, नेताजी भोसले, बालाजी शिंदे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये शेषेराव चिंचोले (उपसरपंच, भाद्रा), विष्णुकांत देशमुख (उपसरपंच, वाळकेवाडी), दयानंद पाटील येवले (सरपंच, पिंपळगाव ये), माधवराव कापसे (सरपंच, खडक मांजरी), दत्ता पाटील दिघे (संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती लोहा), मारुती पाटील पवार पार्डीकर, बापूराव पाटील ढवळे (उपसरपंच, दगडगाव) व बजरंग ढवळे, बाळू जामकर (सरपंच), संजय भालेराव (उपसरपंच, हरसद), राम पाटील किरवले (माजी सरपंच, कारेगाव), पिंटू हंबर्डे (सरपंच बेटसांगवी), उमाकांत शिंदे (उपसरपंच, डेरला), लक्ष्मण घाटोळ (उपसरपंच, बोरगाव कोल्हा), लक्ष्मण फुलझळके (शेवडी बा.) यांच्यासह अनेकांनी प्रवेश केला आहे.

# शाखा अभियंत्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**ईस्लापूर,दि. ०६ मार्च**

इस्लापूर परिसरातील जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांनी केलेले कामे निकृष्ट दर्जाचे झाले आहेत त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाची चौकशी क्वालिटी कंट्रोल मार्फत करण्यात यावी अशी लेखी तक्रार भिसी येथील माजी उपसरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे कार्यकर्ते नंदू गायकवाड , यांनी आयुक्त कार्यालय छ . संभाजीनगर , जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड , मुख्यकार्य अधिकारी कार्यालय नांदेड , यांच्याकडे केली आहे. किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे शाखा अभियंता यांनी केलेल्या अंगणवाडी इमारत , शाळा इमारत , रोड ,आरोग्य इमारत , शिसी रोड , नाली, बंधारे , आदि यांच्या अंतर्गत येत असलेले कामे निकृष्ट दर्जाचे झालेले आहेत . या कामातील उत्तेदारांना हाताशी धरून गावकऱ्यांना न कळूदेत खालच्या दराच्या क्वालिटीचे सिमेंट , गज ,रेती , आदि लागणाऱ्या वस्तू वापरत असल्यामुळे परिसरातील कामे निकृष्ट दर्जाचे झाले आहेत भविंष्यात या निकृष्ट इमारतीमुळे शाळा अंगणवाडी मधल्या चिमुकल्यांना धोका होऊ शकतो? त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कॉलिटी कंट्रोल या विभागाकडून इस्लापूर सर्कल मधील संबंधित कामाची चौकशी करून कामातील कॉलिटी बदल करणाऱ्या संबंधित अभियंता गुत्तेदार यांच्यावर चौकशी करून गुन्हा दाखल करा अशी मागणी लेखी तक्रारद्वारे येथील सामाजिक कार्यकर्ते नंदू गायकवाड , यांनी केली आहे.

# राजीव गांधी महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०६ मार्च**

दि.४ मार्च श्री शारदा भवन एज्युकेशन नांदेड संचालित, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे संस्थेचे संस्थापक श्रद्धेय कै. डॉ. शंकररावजी चव्हाण आणि कै. सौ. कुसुमताई चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त महिला तक्रार व निवारण समितीच्या वतीने 'आरोग्य तपासणी शिबिर व जनजागृती' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र निवघा, ता. मुदखेड येथे कार्यरत असलेल्या आरोग्य अधिकारी डॉ. शुभांगी काळे यांनी महिलांचे आरोग्य : प्रश्न आणि उपाय या विषयावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी विद्यार्थिनींची उंची, वजन, रक्तदाब यांची तपासणी केली. ग्रामीण रुग्णालय, मुदखेड येथील वैद्यकीय अधीक्षक, डॉ. वृषाली येमेकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात आलेल्या त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने जवळपास ८० मुलींची हिमोग्लोबिन तपासणी, सीबीसी रक्त चाचणी करण्यात आली. त्याविषयी विद्यार्थिनींना आरोग्य विषयक सल्ला देण्यात आला. प्रास्ताविक करतांना महिला तक्रार व निवारण समिती समन्वयक, प्रा .सुलोचना माळवे यांनी रक्त तपासणी व आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबिराच्या पाठीमागची भूमिका विशद केली. त्यानंतर प्रा. नंदा करंजकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य ए. टी. शिंदे सरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शिबिराचा आणि मार्गदर्शनाचा फायदा घेऊन मुलींनी आपली व आपल्या आईच्या आरोग्याची काळजी घ्यावी असे सुचविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हे द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी गायत्री पांचाळ यांनी व आभार प्रदर्शन बी.ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी नाझिया पठाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीमध्ये डॉ. ज्योती मुंगल, डॉ.नंदा करंजकर आणि प्रा. निकिता शिंदे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी एम. डांगे, आणि डी. सी इंगोले यांनी महत्वाची भूमिका बजावली. या शिबिरासाठी महाविद्यालयातील सर्व कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीया वर्षाच्या विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

# श्रीक्षेत्र पिंपळगाव येथील शिवमहापुराण कथेस सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**तामसा,दि. ०६ मार्च**

श्रीक्षेत्र पिंपळगाव येथे आजपासून येत्या भव्य शिवमहापुराण कथा व श्री. १०८ कुंडी विश्वशांती दत्तयाग यज्ञ होणार आहे. श्रीगद्गुरु श्री. राजेंद्रदास देवाचार्य वृंदावन धाम उत्तरप्रदेश यांच्या अमृत वाणीतून शिवमहापुराण कथा सुरू झाली आहे. लाखोच्या संख्येने भाविक उपस्थित असून कार्यक्रमासाठी पिंपळगाव आता सज्ज झाले असल्याचे शिवसद्गुरु परमपूज्य गोवत्स बालयोगी व्यंकटस्वामी महाराज यांनी सांगितले.



श्री. १०८ कुंडी विश्वशांती दत्तयाग महायज्ञ दररोज सकाळी असेल. दररोज नोंदणीकृत ४३२ जोडपे महायज्ञाला बसतील. ९ मार्च रोजी श्री. हनुमानमूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारण होणार आहे. सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ७ ते १० श्री. गुरुचरित्र, श्री. ज्ञानेश्वरी, श्री. परमरस्य ग्रंथ पारायण अनुष्ठान व सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० कीर्तन, रात्री ११ ते ४ महापूजा असेल. गुरुवारी परमपूज्य राधाकृष्णजी महाराज जोधपुर यांची भजनसंध्या होईल.

**चोख पोलीस बंदोबस्त**

शिवमहापुराण कथेदरम्यान पोलीस बंदोबस्तासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाशकुमार यांचे मार्गदर्शनाखाली बंदोबस्तप्रमुख अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे, प्रभारी प्रमुख अर्धापूर उपविभागीय पोलीस अधिकारी ग्यानियन बेन आहेत. बंदोबस्तासाठी पोलीस निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक, फौजदार दर्जाचे ४० अधिकारी, १८० पोलीस अंमलदार, ४० महिला पोलीस अंमलदार, २०० होमगार्ड पुरुष/महिला, १०० पोलीस मित्र, २०० स्वयंसेवक, महिला व पुरुष दोन दंगल नियंत्रण पथक तैनात असून गर्दी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नजरेत असेल चोख बंदोबस्तासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी दिली.

**मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित राहणार**

दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदिनाथ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थिती लावणार आहेत.

# आठ दिवसात २ कोटी ८२ लक्ष निधी लाभार्थ्यांना वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०६ मार्च**

**नगरपरिषद हदगावची विक्रमी कामगिरी**

नगरपरिषद हदगाव अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) मधील शहरातील घरकुल लाभार्थी यांना मिळणारे अनुदान म्हाडा कार्यालय कडून नगरपरिषदेस प्राप्त होताच अवघ्या ८ दिवसात २ कोटी ८२ लक्ष रु.निधी वितरित करून विक्रमी अशी कामगिरी केली असून याकरिता मुख्याधिकारी गौरव वांडेकर, प्रधानमंत्री आवास योजना स्थापत्य अभियंता प्रसाद कदम, लेखा विभागातील संकेत लांडगे व रवींद्र ढेगळे यांनी मागील ८ दिवसात कोणतेही सुट्टी न घेता लाभार्थ्यांना निधी वितरण साठी अहोरात्र अवरीतपणे परिश्रम घेतले त्यांच्या या कामाबद्दल लाभार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट व जनमाणसात अतिशय लोकप्रिय पैकी एक असलेली प्रधानमंत्री आवास योजना असून त्याचा लाभ शहरी तसेच ग्रामीण भागातील बेघर असलेल्या नागरिक या योजनेचा लाभ घेताना दिसून येत आहे. दि.२१ फेब्रुवारी २०२५ ला ३.९८ कोटी रु. नगर परिषदेस प्राप्त झाले त्यानंतर लाभार्थी यांना डीबीटी पी.एफ.एम. एस प्रणालीद्वारे ८ दिवसात २ कोटी ८२ लक्ष रु. वितरीत करून नवा उच्चांक करण्यात आला. यामध्ये ५६ लाभार्थी यांना पहिला हप्ता, ३७२ लाभार्थी यांना शेवटचा हप्ता, ७६ लाभार्थी यांना दुसरा व तिसरा हप्ता असे मिळून लाभार्थी यांना योजनेअंतर्गत २.५० लक्ष रु. प्रति घरकुल निधी प्रमाणे वाटप करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांचा शेवटचा हप्ता बाकी आहे त्या लाभार्थ्यांनी बांधकाम परवानगी शुल्क भरण्या केल्यावर तात्काळ निधी देण्यात येईल असे कळविण्यात आले.

# जलजीवन मिशनचा गळा ! सरपंच ठेकेदारांसह प्रशासनाचाच घोटाळा !

**● करोडोचा निधी मिळालेला तालुक्याचा घसा कोरडाच..?**

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. ०६ मार्च**

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून निर्माण करण्यात आलेली देशासाठी महत्वकांक्षी असलेल्या जलजीवन मिशन योजेनेतुन जिल्ह्यातील दुर्गम - डोंगराळ माळराणावर वसलेल्या तालुक्यातील भिषण पाणीटंचाई ग्रस्त गावाचा पाणीप्रश्न कायमचा सोडवुन टँकर मुक्त गाव करण्यासाठी हर घर जल हे ब्रिदवाक्य घेऊन निर्माण झालेल्या जलजीवन मिशन योजनेसाठी मुखेड तालुक्यातील १११ गावांसाठी तब्बल २०० कोटीच्या वर निधी मिळाला परंतु भ्रष्टाचाराची किढ लागलेल्या तालुक्यातील कंत्राटदार,सरपंच व प्रशासनाच्या एकजुटीने सर्व गावांमध्ये थातुरमातुर कामे करत करोडो रूपयांचा निधी हडप करून तालुक्यातील नागरिकांचा तहानलेला घसा कोरडा ठेवला आहे.



जलजीवन मिशननचे कामे सन २०२४ अखेर पर्यंत पुर्ण करणे बंधनकारक होते परंतू वेळखाऊ व भ्रष्टाचारी व्यवस्थेने ते अपर्णच ठेवले आहेत. काही गावांमध्ये टाकी बांधली तर पाईलाईन नाही,पाईप लाईन आहे तर विजपुरवठा नाही.जिथे सर्व उपलब्ध आहे तिथे कामच भ्रष्ट आहे. अशी बोलकी परिस्थिती दिसून आहे.

या कामाच्या देखरेखीसाठी असलेले सरपंच - ग्रामसेवक, अधिकारी व गावस्तरावरील लोकप्रतिनिधींना गुत्तेदारांनी चेरी - मेरी देऊन करोडो रूपयांची निधी घशात घातल्याची चर्चा टंचाईग्रस्त गावातील संतृप्त नागरिकांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे. यावर्षी कडक उन्हाळा दिसुन येत असल्याने तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण झाली आहे. अनेक ग्रामपंचायतीने टँकर मागणीसाठीचे प्रस्ताव पंचायत समितीचेकडे सादर केले असल्याने जलजीवन मिशनच्या अपूर्ण कामामुळे शासनाला आर्थिक फटका बसणार आहे तर सामान्य नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार असल्याचे मात्र निश्चित आहे.

जलजीवन मिशनच्या भ्रष्ट कारभाराची जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी महोदयांनी तातडीने दखल घेऊन उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर जलजीवन मिशनच्या भ्रष्ट व वेळखाऊ कंत्राटदारांचे नावे काळ्या यादीत टाकण्यात यावेत व सदरील कामाला गती द्यावी आणि तहानलेल्या गावांसाठी सुरळीतपणे पाणीपुरवठा करावा अशी मागणी तालुक्यातील टंचाईग्रस्त गावातील तहानलेल्या नागरिकांतुन केली जात आहे.

# बौध्द गया येथील महाबोधी महाविहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात दयावे : बहुजन संघर्ष सेना

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ मार्च**

महाकारुनी तथागत भगवान गौतम बुध्दांना जेथे ज्ञानाची प्राप्ती झाली ते बौध्द गया येथील प्राचीन महाबोधी महाविहार हे जगभरातील बौध्दांचे सर्वोच्च पवित्र श्रध्दास्थान आहे. बौध्दांचे श्रध्दास्थान बौध्दांच्याच ताब्यात असले पाहिजे. महाबोधी महाविहाराचे संपुर्ण व्यवस्थापन बौध्दांच्या ताब्यात देणे हा नैसर्गिक न्याय ठरेल. त्यामुळे १९४९ चा महाबोधी महाविहार व्यवस्थापन कायदा दुरूस्त करून महाबोधी महाविहार व्यवस्थापन समितीत सर्व सदस्य बौध्द असांवेत असा कायदा करून महाबोधी महाविहार बौध्दांच्याच ताब्यात दयावे अशी सर्व बौध्द अनुयायांची मागणी आहे. या मागणीच्या अनुषंगाने महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन देशभरात मागील अनेक दिवसांपासून बौध्द गयेतील महाबोधी महाविहार येथे बौध्द भिक्षुचे आंदोलन चालू आहे.

# महिला दिनानिमित्त भव्य जलतरण स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०६ मार्च**

जागतकि महिला दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व मुली/महिलांसाठी भव्य जलतरण स्पर्धेचे आयोजन रविवार दि.९ मार्च २०२५ रोजी कै.शांताराम सगणे जलतरणिकेवर केले आहे. इच्छूक स्पर्धकांनी जलतरणीकेवर संपर्क साधावा. तरी सर्व महिला जलतरणपटूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन नांदेड जिल्हा गोदावरी मास्टर्स क्वॅटिक असोसिएशनने केले आहे.

**CHANGE IN NAME**

My old name is **Balaji Ramchandra pansare** which now I changing as new Name **Balaji Ramchandrarao Pansare** Hence forth my all correspondence will be done as par my new name. Please consider the same

**Address:** H.NO.1/7/2508 ramganga Nivas Nandigram Housing Society Sharda Nagar near Anand Nagar Maharashtra 431605
**Phone no.9922655083**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे जिल्हा कचेरीसमोर धरणे

## एकच मिशन जुनी पेन्शनची मागणीसाठी केली निदर्शने



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**
राज्य सरकारी कर्मचारी-शिक्षक यांचे राज्यस्तरीय समन्वय समितीच्या सुकाणू समितीसह प्रलंबीत मागण्यांसंदर्भात अनेक महत्वाची चर्चासत्रे पार पडली परंतु शासनाने केवळ आश्वासने दिली. कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे १८ प्रलंबीत मागण्यांसाठी दि ६ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी हातामध्ये फलक घेऊन एकच मिशन जुनी पेन्शन साठी घोषणाबाजी करण्यात आली.

सरकारी-निमसरकारी,शिक्षक-शिक्षकेत्तर, नगर परिषद-नगर पंचायत कर्मचारी समन्वय समितीच्यावतीने विविध प्रलंबीत मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात येणार असून त्यामध्ये सुधारीत राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत विस्तृत परिपत्रक तत्काळ जारी करावे, खुल्लर समितीचा अहवाल तत्काळ प्रसिध्द करावा, पीएफआरडीए कायदा रद्द करण्यात यावा व निधी मॅनेजरकडे संचीत झालेली रक्कम संबंधीत राज्य सरकारला परत करण्यात यावी, तसेच ईपीएस ९५ नुसार असणाऱ्या सर्व वर्गणीदारांना परिभाषित पेन्शन योजना लागू करण्यात यावी, सर्व कंत्राटी, अंशकालीन, रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करावे, सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण रद्द करावे, सरकारी विभागाचे संकोचीकरण तत्काळ थांबवावे, आठव्या वेतन आयोगाची सत्वर स्थापना करण्याबाबत केंद्र शासनाकडे आग्रह धरावा किंवा प्रत्येक ५ वर्षाच्या कालावधीनंतर वेतनमान पुनर्रचनेसाठी राज्याचा स्वतंत्र आयोग नेमावा, सर्व कर्मचाऱ्यांना इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी व्यापक विमा योजना लागू करावी, सरकारी कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्याबाबत ३५३ कलमात दुरूस्ती करावी, सर्व संवर्गातील रिक्तपदे भरण्यासाठी कार्यवाही करावी, चतूर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवावी, कर्मचारी-अधिकारी यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात यावे, राज्यातील नगर परिषदा आणि नगर पंचायतीचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यात यावा तसेच कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप कदम, सुनील कदम, पी एन खैरनार, पी एस फुलसावंगे, हर्षवर्धन गवई, डी ए पौळ, के एन खंदारे, डी एस निमजे, प्रशांत देशमुख, एम डी भालेराव, प्रियंका खडसे, सोनु लिंबाळकर, कुसुम भिसे, रूपाली नरवाडे, पी एम जायभाये, जी व्ही गायकवाड, पी व्ही काळबांडे, एस पी अटकोरे, सी ए मगर, डि डब्ल्यू शिंदे, बी जे ढगे यांच्यासह विविध संघटनेचे पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४५ कोटी निधीतून रेल्वे उड्डाणपूलाचे काम- आ. मुटकुळे

## तहसीलजवळील रेल्वे उड्डाणपूलाचे कामाचे भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तहसील जवळील रेल्वे उड्डाणपूलाच्या कामासाठी ४५ कोटींचा निधी दिला असून या पूलामुळे शहरातील वाहतुकीचा प्रश्न मिटणार असून आता अकोला बायपास ते नांदेड नाक्यापर्यंत शहरात येण्यासाठी अखंड चौपदरी रस्ता या पूलाच्या बांधकामानंतर होणार असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली. दि ६ मार्च रोजी आ. मुटकुळे यांचेहस्ते या पूलाच्या बांधकामाचे भूमीपूजन करण्यात आले

याप्रसंगी माजी आमदार रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, महारेलचे राकेश कुमार शर्मा, गुत्तेदार आर. एस. व्ही., माजी नगरसेवक सदाशिव सूर्यतळ, प्रशांत सोनी, मोतीराम इंगोले, वीर कुवर अण्णा, हमीद प्यारेवाले, उमेश नागरे, गणेश शाहू, उमेश गुट्टे, कैलास शहाणे, राजू यादव, आशिष जयस्वाल, बाबा घुगे, मनोज शर्मा, श्याम खंडेलवाल, शंकर जोजार आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, यापूर्वीच अकोला बायपास ते रिसाला बाजार तसेच छत्रपती शिवाजी नगर ते नांदेड नाका इथपर्यंत चौपदरी रस्त्याचे काम झाले आहे. केवळ तहसीलसमोरील रस्ता रेल्वे उड्डाणपूलामुळे करता येत नव्हता. यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत पाठपुरावा केला. त्यांनी या पुलाच्या बांधकामासाठी ४५ कोटी निधी मंजूर केला. या कामाच्या निवीदा निघाल्या असून आजपासून कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली आहे. या रेल्वे उड्डाणपूलावर दोन्हीही बाजुलंनी साडेसात मीटर असा १५ मीटरचा रस्ता होणार असून या रस्ता झाल्यानंतर शहरातील वाहतुकीची कोंडी होणार नसून यामुळे नागरिकांना सुविधा मिळणार आहे. अकोला बायपास ते नांदेड नाका पर्यंत आता अखंड चौपदरी रस्ता होणार आहे. या पूलामुळे शहराच्या विकासात आणि सुशोभिकरणात भर पडणार आहे.

# लोककला ही सर्व विकसित कलेची जननी- परसवाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**
लोककला ही सर्व विकसित कलांची जननी आहे. तिचे आपण सर्वांनी स्वागत केले पाहिजे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार भ. मा. परसावळे यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात आयोजित लोकसंगीत महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे सहाय्यक संचालक संदीप बलखंडे, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी, प्रा.डॉ. किशोर इंगोले, लोककला अभ्यासक भगवान राऊत आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना चित्रकार भ. मा. परसावळे पुढे म्हणाले की, नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला या सर्वांची पाळेमुळे आदिवासी संस्कृतीतून आलेली आहे. ते त्यांच्या संस्कृतीचा आणि जीवनाचा एक अविभाज्य घटक आहेत. नृत्य, नाट्य, लोक संगीत हे त्यांच्या अंतर्मनातून प्रकट झालेला अविष्कार आहे. पूर्वीच्या काळी तळागाळातील लोकसंगीतासाठी कुठलाही राजाश्रय नव्हता परंतु अलीकडच्या काळात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने या सर्व कलांची आणि कलावंतांची दखल घेतली जाते. लोककलावंतांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते आणि वर्षभर वेगवेगळे महोत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात ही समाधानाची बाब आहे, असे ते म्हणाले.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या लोकसंगीत महोत्सवाचे शानदार उद्घाटन झाले. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने सहाय्यक संचालक संदीप बलखंडे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन सत्कार केला. संदीप बलखंडे यांनी प्रास्ताविक केले. गणपत माखणे यांनी सूत्रसंचालन केले तर सचिन पाईकराव यांनी आभार मानले. उद्घाटन कार्यक्रमानंतर गायिका संज्योती जगदाळे, गायक कुणाल वराळे, शाहीर मिरा उमप व श्रावणी महाजन आणि सहकाऱ्यांचा लोकसंगीताचा बहारदार कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास हिंगोलीच्या रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली.



**हिंगोली- भारतीय जनता पक्षाचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या यमुना निवास स्थानाची गुरूवारी वास्तू शांती होती. यानिमित्त सुप्रसिध्द किर्तनकार हभप रामराव महाराज ढोक यांचे किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. तान्हाजी मुटकुळे, शिवाजी मुटकुळे यांच्यासह भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी सभापती उत्तमराव जगताप यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### पवार पब्लीक स्कूलचे ऑलंपियाडमध्ये यश



हिंगोली- हिंगोली शहरातील पवार पब्लिक स्कूल येथील पहिली ते सहावी वर्गातील विद्यार्थ्यांनी सायन्स ओलंपियाड परीक्षेमध्ये सुवर्णपदक तसेच प्रमाणपत्र प्राप्त करीत घवघवीत यश मिळवले आहे. वर्ग पहिलीतून यश मिळवणारी सृष्टी डब्बे, प्रीता कल्याणकर, अब्दुल रहमान, व वर्ग दुसरी मधून दिव्यांश अग्रवाल, नव्या शिंदे, आदित्य रणखांबे, त्याचबरोबर वर्ग तिसरी मधून शेख उबैद, महिरोद्दीन सिद्दीकी, अथर्व जोगदंड, विराज पवार, आरबान पठाण, उत्कर्ष बरकले, अथर्व गडदे, उत्कल इंगोले, तसेच वर्ग चौथी मधून अलविरा खान, सानिध्य बोरकर, रोशनी खंदारे, रुचिका पंडित, वर्ग पाचवी मधून प्रणव पुनेवाड, व वर्ग सहावी मधून रुद्राक्ष पंडित, बिलाल सय्यद, आराध्या भिसे, प्रतीक जराड, प्राप्ती चव्हाण व वर्ग सातवी मधून उत्तरा खंदारे, प्रतिष्ठा नरवाडे, शेख आयेशा यांचा समावेश आहे.

### ३० क्विंटल तांदुळाचा माल पोलिसांकडून जप्त



हिंगोली- शहर पोलिसांनी पेट्रोलींग दरम्यान एका वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ३० क्विंटल तांदुळाची अवैधपणे वाहतुक करीत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत चालकाची विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने पोलिसांनी ३० क्विंटल तांदुळासह वाहन शहर पोलिस ठाण्यात आणले असून सदरील कार्यवाही सहायक पोलिस निरीक्षक परगेवार, रहीम चौधरी, दिलीप धामणे, कऱ्हाळे, करे, क्षीरसागर, वाबळे, इंगळे, गव्हाणे, सांगळे यांनी केली आहे. याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे.

### १८ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली-अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत वाहन चालकांकडून ९ हजार ५०० रूपयांचा दंड वसुल केला तसेच १९ ठिकाणी अवैध दारूविक्री अड्डयावर छापे मारले.

# पोलिस विभागाकडून जिल्ह्यात अवैध दारू गाळप, विक्री विरोधात मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ मार्च**
जिल्ह्यात अवैध दारू गाळप व विक्री विरोधात पोलिस विभागाच्यावतीने दि ५ मार्च रोजी विशेष मोहीम राबविण्यात आली. यावेळी पथकांनी मोठ्या प्रमाणात अवैध दारू गाळप व रसायने जप्त करीत नष्ट केले.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी पोलिस अधिकारी, दुय्यम अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे दुय्यम अधिकारी, अंमलदार यांनी एकाच दिवशी ही विशेष मोहीम राबवली. यावेळी ठिकठिकाणी अवैध दारू गाळप व विक्री करणाऱ्यांवर छापे मारण्यात आले. जिल्ह्यातील एकूण ५ अवैध हातभट्टी गाळप व विक्री वर कार्यवाही करीत हातभट्टीसाठीचे लागणारे रसायन व इतर साहीत्य नष्ट करण्यात आले. एकूण ६० लिटर हातभट्टी दारू, ७३५ सडके रसायने, अवैध देशी दारू विक्रीच्या ८ ठिकाणी ११५ देशीदारू बॉटल, २७ विदेशी दारू बॉटल जप्त करून कार्यवाही केली. तसेच १३ आरोपी विरोधात १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# जागतिक महिला दिनानिमित्त ८ मार्चला महिला मेळावा

## बचत गटांच्या वस्तूंचे जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ६ मार्च**
महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त येथील महावीर भवन येथे शनिवार, दि. ८ मार्च, २०२५ रोजी महिला मेळावा व नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत बचत गटाद्वारे उत्पादित वस्तुचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन दि. ८ मार्च रोजी दुपारी १२ वाजता आमदार तान्हाजी मुटकुळे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव राहणार आहेत. यावेळी महिला आर्थिक विकास महामंडळाचे विभागीय संसाधन अधिकारी केशव पवार, विभागीय सल्लागार पवन देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी जी. जी. चितळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी राजाभाऊ मगर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, आयसीआयसीआय बँकेचे व्यवस्थापक अनिल इंगोले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे.

बचत गटाद्वारे उत्पादित वस्तुचे जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन महावीर भवन, वाशिम रोड, रामलीला मैदानाजवळ, हिंगोली येथे दि. ८ ते १० मार्च, २०२५ या कालावधीत सकाळी १० ते रात्री ९.३० वाजेपर्यंत सुरु राहणार आहे.

या उद्घाटन कार्यक्रमास व बचत गटाच्या विक्री प्रदर्शनास भेट देऊन याचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी केलेआहे.

# विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच खेळालाही महत्व द्यावे- गोयल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ मार्चे**
विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकीज्ञान आत्मसात करण्यापेक्षा शिक्षणासोबतच खेळालाही महत्व देऊन सर्वांगीण विकास साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी क्रिडा महोत्सवाच्या एका कार्यक्रमात केले.

येथील लिंबाळा मक्ता भागातील एबीएम इंग्लीश स्कुलमध्ये आयोजित क्रिडा स्पर्धांचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेहस्ते झाले. याप्रसंगी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, क्रिडाधिकारी राजेश मारावार, उपशिक्षणाधिकारी नितीन नेटके, संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, अजिंक्य बांगर, मुख्याध्यापक के जे जोसेफ यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी गोयल म्हणाले की, विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्यादृष्टीने अभ्यास करावा. तसेच जिद्दीने अभ्यास करून कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवली पाहीजे. यावेळी त्यांनी एबीएम इंग्लीश स्कुलच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मनोगतात त्यांचे शालेय जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रत्येक खेळामध्ये सहभाग महत्त्वाचा आहे. आपण जिंकलेच पाहिजे असे काही नाही, असेही ते म्हणाले कार्यक्रमाच्या प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांनीही खेळाचे महत्व सांगून क्रीडा क्षेत्रातही भविष्यात खूप संधी आहेत प्रत्येकाने यामध्ये सहभागी होऊन आपला विकास घडवावा असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर यांनी हे आपले मनोगत व्यक्त करताना शाळेच्या सर्वांगीण प्रगतीची माहिती दिली शाळेमध्ये शैक्षणिक सुविधा, आधुनिक तंत्रज्ञान, शारीरिक शिक्षणाच्या सुविधा, तसेच विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडीवरनुसार संगीत क्षेत्रातील शाळेत मिळणाऱ्या सुविधा, नृत्य स्पर्धा, तसेच नेमबाजी, मल्लखांब क्षेत्रीय भेट अशा अनेक वेगवेगळ्या सुविधांच्या अत्यंत थोडक्यात परिचय करून देत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबद्दल शाळा कोणत्याही प्रकारची तडजोड करत नाही क्रीडा सामन्यांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यासाठी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मशाल पेटवण्यात आली व शाळेतील वेगवेगळ्या ग्रुपच्या प्रमुखांनी ती एकमेकांना देऊन रीतसर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शाळेमध्ये वेगवेगळ्या वयोगटानुसार सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे. शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. अशा पद्धतीने अत्यंत भव्य असा वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन प्रसंगी पूर्ण करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थिनी कनिष्का हेडा, नक्षत्रा अरुणा, श्रेया घोंगडे, शरयू शेळके, यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे अध्यक्ष अजिंक्य बांगर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.